




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १८२ * नांदेड * शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# धक्कादायक : विष्णुपुरी नवीन उड्डाणपुलाचा भाग कोसळला; एक गंभीर जखमी, वाहतूक बंद

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नागपूर - नांदेड - येडशी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील विष्णुपुरी येथील उड्डाणपुलाचा डाव्या बाजूचा सुमारे १५ फूट लांबीचा भाग बुधवार, दि. ९ जुलै रोजी कोसळल्याची घटना घडली. यामध्ये एक पादचारी गंभीर जखमी झाला असून दुचाकीवरील दोन महिला किरकोळ जखमी झाल्या आहेत. अपघातानंतर पुलावरील वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली आहे.

ही घटना सकाळी ११.४० वाजताच्या सुमारास एसजीजीएस अभियांत्रिकी महाविद्यालयासमोर घडली. उड्डाणपुलाच्या डाव्या बाजूला टाकण्यात आलेल्या सिमेंट कॉंक्रीटच्या विटांचा काही भाग अचानक खाली कोसळला. यावेळी खालून जाणाऱ्या एका पादचाऱ्याच्या डोक्याला व शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली. त्याचवेळी तेथून जाणाऱ्या दुचाकीवरील दोन महिलांनाही किरकोळ मार लागला.

मध्यरात्री झालेल्या भूकंपाच्या तीव्र धक्क्यांमुळे




हा भाग कोसळला का, की बांधकामाच्या दर्जात त्रुटी आहे, याबाबत परिसरात उलट-सुलट चर्चा सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, महसूलचे उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, नांदेडचे तहसीलदार संजय वारकड आणि विष्णुपुरीचे तलाठी गिरी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

के.टी. कन्स्ट्रक्शन कंपनीचे व्यवस्थापक आनंद पुयड (पान ६ वर...)

### दोषींवर कठोर कारवाई करा –खा. रवींद्र चव्हाण

नांदेड-लातूर राष्ट्रीय महामार्गावरील श्री गुरू गोविंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरील पुलाचा भाग कोसळल्याची घटना अत्यंत गंभीर असून त्यामुळे नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. पुलाच्या बांधकामामध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य, निष्काळजीपणा अथवा अन्य कोणतीही अनियमितता झाली आहे का? याची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. चौकशीत दोष सिद्ध झाल्यास संबंधित कंत्राटदार, अभियंते व जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खासदार रवींद्र चव्हाण यांनी केली आहे.

### विष्णुपुरी पुलाच्या घटनेची गंभीरपणे चौकशी व्हावी –खा. डॉ. अजित गोपछडे

विष्णुपुरी येथील पुलाच्या एका भागाची रिटेनिंग वॉल ढासळल्याची घटना लक्षात घेता, संबंधित विभागाने याची गंभीरपणे तांत्रिक व सखोल तपासणी करून नेमके कारण स्पष्ट करावे. तपासणीत कोणत्याही प्रकारची त्रुटी किंवा निष्काळजीपणा आढळल्यास नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी, तसेच आवश्यक दुरुस्ती तातडीने पूर्ण करून नागरिकांच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घ्यावी, अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केली आहे.

## विष्णुपुरी पूल दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करा

### आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांची पावसाळी अधिवेशनात मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील विष्णुपुरी परिसरातील पुलाच्या दुर्घटनेची चौकशी करण्याची मागणी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी विधानभवनात केली.



जिल्ह्यात मध्यरात्री झालेल्या ४.२ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची राज्य शासनाने तातडीने दखल घ्यावी, नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून बाधित नागरिकांना त्वरित मदत व नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी जोरदार मागणी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी विधानभवनातील पावसाळी अधिवेशनादरम्यान केली. मध्यरात्री झालेल्या भूकंपामुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याशिवाय विष्णुपुरी येथील राष्ट्रीय महामार्गावरील पूल कोसळल्याची अत्यंत गंभीर घटना घडल्याचे सांगत, या घटनेची उच्चस्तरीय चौकशी (पान ६ वर...)

# भूकंपाच्या धक्क्यांनी नांदेड हादरले

## नागरिकांनी रात्र जागून काढली; रिश्टर स्केलवर ४.६ ते ३.६ ची नोंद

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडकर गाढ झोपेत असताना गुरूवार, दि. ९ जुलै रोजी मध्यरात्री १.३६ मिनिटाला भूकंपाच्या धक्क्यांनी नांदेड हादरले. अवघ्या दोन तासांत पहाटेपर्यंत ४ सौम्य धक्के जाणवले. हिंगोली जिल्ह्यात याचा केंद्रबिंदू असला तरी नांदेडमध्ये जाणवलेल्या धक्क्यांची तीव्रता रिश्टर ते ४.६ दरम्यान असल्याची विद्यापीठाने माहिती दिली.


बहुतांश नागरिक गाढ झोपेत असताना गुरूवारी मध्यरात्रीनंतर भूकंपाचे धक्के सुरू झाले. पहिला धक्का रात्री १.३७ वाजता जाणवला, याची तीव्रता ४.६ रिश्टर स्केल नोंदवली गेली. या धक्क्यामुळे घरातील दरवाजे, खिडक्या आणि वस्तू हलत असल्याची जाणीव झाली. काही सेकंद जाणवलेल्या या कंपनांमुळे अनेक नागरिक भयभीत होऊन घराबाहेर पडले.

- भुकंपाची खोली जमिनीखाली १० किलोमीटर इतकी होती.
- दुसरा धक्का (गुरूवारी पहाटे २:१५): काकडधावा गावाच्या परिसरात ३.६ रिश्टर स्केल तीव्रतेचा बसला.
- तिसरा धक्का (पहाटे २:१७): दुसऱ्या धक्क्यानंतर अवघ्या दोनच मिनिटांत पुन्हा काकडधावा परिसरात ३.९ रिश्टर स्केल.
- चौथा धक्का (पहाटे ३:२३) पहाटे सव्वातीनच्या सुमारास काकडधावा गावातच ४.१ रिश्टर स्केल तीव्रतेचा चौथा धक्का बसला.

यानंतर सोशल मीडिया आणि मोबाईल संदेशांच्या माध्यमातून भूकंपासंदभांतील माहिती वेगाने पसरल्याने भूकंपाचा केंद्रबिंदू शहरात काही काळ धक्क्यांनी भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. भूकंपाचा परिणाम केवळ स्केलवर ३.६ हिंगोली जिल्ह्यापुरता समोर आली मर्यादित राहिला नाही. नांदेड आणि परभणी जिल्ह्यांतील अनेक भागांतही नागरिकांना कंपनांची जाणीव झाली. काही भागांत घरांच्या खिडक्या आणि दरवाजे हलल्याचे नागरिकांनी सांगितले.

अवघ्या दोन तासांच्या कालावधीत एकापाठोपाठ एक असे भूकंपाचे ४ सौम्य धक्के बसले. भूकंपाचा केंद्र बिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत असला तरी नांदेडात जाणवलेल्या या धक्क्यांनी भयभित झालेल्या अनेक नागरिकांनी अक्षरशः रात्र जागून काढली. परंतू

दरम्यान, भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील शिरली गावात पहिला धक्का (बुधवारी मध्यरात्रीनंतर १:३७): सिर्ली-पांग्रा शिंदे गाव परिसरात ४.६ रिश्टर स्केल




तीव्रतेचा पहिला मुख्य धक्का जाणवला. याची

या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली आहे. भूकंपाची पूर्वकल्पना देणे शक्य नसल्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे. भूकंपाचे धक्के जाणवताच घराबाहेर पडून मोकळ्या जागेत जमावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

### नागरिकांनी घाबरू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये –पालकमंत्री अतुल सावे

नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असून त्यांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून आवश्यक सूचना दिल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नसून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरून जाऊ नये आणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले आहे.

# नांदेड-मुंबई नियमित विमानसेवा लवकरच सुरू होणार

## मुख्यमंत्री फडणवीस यांची आमदारांना ग्वाही



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील श्री गुरुगोविंद सिंघ विमानतळ नांदेड-मुंबई नियमित विमानसेवा लवकरच सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड जिल्ह्यातील आमदारांच्या शिष्टमंडळाला दिली. या निर्णयामुळे नांदेडसह मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार हेमंत पाटील, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार राजेश पवार, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार भीमराव केराम, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंदराव बोढारकर आणि आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन विमानसेवा तातडीने सुरू करण्याची मागणी केली.

सध्या नांदेड विमानतळ सर्व सुविधांनी सुसज्ज असले, तरी मुंबई विमानतळावर स्लॉट उपलब्ध नसल्यामुळे ही सेवा बंद आहे. मुंबई येथे नव्या विमानतळाचे काम सुरू असल्याने भविष्यात स्लॉट उपलब्ध होऊन नांदेड मुंबई विमानसेवा नियमित सुरू होण्याचा मार्ग मोकळा होईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

दररोज सकाळी नांदेडहून मुंबईकडे आणि रात्री मुंबईहून नांदेडकडे विमानसेवा सुरू झाल्यास उद्योग, व्यापार, पर्यटन आणि व्यावसायिक क्षेत्राला मोठी चालना मिळेल. तसेच नांदेड, लातूर, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांनाही या सेवेचा लाभ होणार असल्याचे शिष्टमंडळाने सांगितले.

### विभागीय आयुक्तालयाच्या प्रश्नावरही सकारात्मक भूमिका

यावेळी छत्रपती संभाजीनगर महसूल विभागाचे विभागीय आयुक्तालय नांदेड येथे स्थापन करण्याच्या मागणीकडेही मुख्यमंत्री फडणवीस यांचे लक्ष वेधण्यात आले. २०२५ पासून प्रलंबित असलेला हा प्रश्न तातडीने सोडविण्याची विनंती करण्यात आली. नांदेड येथे विभागीय आयुक्तालय झाल्यास नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचून विकासाला गती मिळेल, असे शिष्टमंडळाने सांगितले. यावर सकारात्मक भूमिका घेत हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

# समान नागरी कायदा लवकरच विधिमंडळात; ७ जणांची समिती गठीत, मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)–** उत्तराखंडनंतर आता महाराष्ट्रात लवकरच समान नागरी कायदा अस्तित्वात येणार असल्याचे दिसून येते, त्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या अधिवेशनातच याबाबत माहिती दिली होती. समान नागरी कायद्यासंदर्भात ७ जणांची समिती नेमण्यात येत असून सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून सात जणांची समिती घोषित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत गुरूवारी समान नागरी कायद्याबाबत पुन्हा एकदा घोषणा केली, ही समिती येत्या सहा महिन्यात अभ्यास करून अहवाल सादर करणार आहे. समान नागरी कायद्याचा मसूदा येत्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात येणार आहे. दोन्ही सभागृहासमोर हा मसुदा आल्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर करण्यासाठीचे सोपस्कार पार पडतील.


२०२६ च्या अर्थसंकल्प अधिवेशनातसमाननागरीकायद्यासंदर्भात आणि अंमलबजावणीसाठी समिती घोषित केले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री यांनी केली होती. त्यानुसार, समान नागरी कायद्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात जणांची कमिटी तयार करण्यात येत आहे, अशी माहिती आशिष शेलार यांनी दिली.

दरम्यान, समान नागरिक कायद्यासाठी या सात जणांची समिती तयार करण्यात आली असून डिसेंबरच्या अधिवेशनात याबाबतचा अहवाल तयार केला जाईल आणि दोन्ही सभागृहात हे विधेयक मांडण्यात येईल, असेही आशिष शेलार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# बंगालच्या उपसागरातील ढग निवळले, राज्यातील पावसाचा जोर ओसरणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात गेल्या काही दिवसांपासून थैमान घालणाऱ्या पावसाचा जोर आता हळूहळू कमी होताना दिसत आहे. मात्र, अद्यापही काही जिल्ह्यांत पावसाचा धोका कायम आहे.

पुणे आणि सातारा घाटमाथ्यावर अतिजोरदार पावसाची शक्यता असल्याने स्थानिक प्रशासनाला आणि नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. तर उर्वरित कोकण किनारपट्टी, घाटमाथ्यातील काही भाग आणि उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांसाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरातील ढगांची संख्या कमी झाल्यामुळे, पुढील काही दिवसांत उर्वरित राज्यात पावसाची उघडीप मिळण्याची शक्यता आहे. आता पाऊस प्रामुख्याने स्थानिक हवामानानुसार पडेल. गेल्या २४ तासांत कोकण आणि घाटमाथ्यावर पावसाचा जोर प्रचंड होता. अनेक ठिकाणी ३०० मिमीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. राज्यातील सर्वाधिक पाऊस घाटमाथ्यावरील ताम्हिणी (५३० मिमी) येथे झाला. सोलापूरमध्ये राज्यातील उच्चांकी ३२ अंश सेल्सिअस तापमान, तर महाबळेश्वरमध्ये नीचांकी १८.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले.



# देशात पावसाची एकूण तूट २४ टक्क्यांवर, आतापर्यंत ३५० लाख हेक्टरवर खरीप पेरणी पूर्ण

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे जूनमध्ये ३३% पावसाची तूट नोंदवली गेली, त्यानंतर जुलैमध्ये मान्सूनच्या परिस्थितीत सुधारणा दिसून आली, आणि पावसाची एकूण तूट कमी होऊन २४ टक्क्यांवर आली. गेल्या काही दिवसांत देशाच्या अनेक भागांमध्ये चांगला पाऊस झाल्यामुळे पर्जन्यमानाची कमतरता असलेल्या जिल्ह्यांची संख्या २६२ वरून १७८ वर आली. आतापर्यंत ३५० लाख हेक्टरवर खरीप पेरणी पूर्ण झाल्याची माहिती केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिली.

नवी दिल्लीत उच्च स्तरीय आढावा बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना चौहान म्हणाले की, केंद्र सरकार महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, बिहार, झारखंड, तेलंगणा, आंध्र प्रदेश, पंजाब, पश्चिम बंगाल आणि ओदिशा येथील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत आहे. जुलै महिन्यात पावसाचा जोर आणखी वाढेल, आणि त्यामुळे खरीपातील पेरणीला गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आतापर्यंत ३५०.८५ लाख हेक्टरवर खरीप पेरणी पूर्ण झाली असून गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ती अंदाजे ९१.९५ लाख हेक्टरने कमी आहे अशी माहिती केंद्रीय मंत्र्यांनी दिली. त्यांनी सांगितले की, मान्सूनच्या उशिरा आगमनाचा विशेषतः सोयाबीन आणि कापसाच्या पेरणीवर परिणाम झाला आहे. तथापि, पावसाला झालेल्या विलंबाचा परिणाम कमी करण्यासाठी शेतकऱ्यांना मका, बाजरी आणि मूग यासारखी कमी कालावधीत तयार होणारी आणि कमी पाणी लागणारी पिके घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

चौहान म्हणाले की, सरकारने एप्रिलपासूनच या आव्हानाचा सामना करण्याची तयारी सुरू केली होती. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या सहकार्याने, प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या जिल्ह्यांसाठी आपत्कालीन योजना तयार करण्यात आल्या आणि राज्य सरकारांना त्या खूप आधीच कळवण्यात आल्या.

# नांदेडमध्ये 'शहजादी डिझायनर' शोरूममध्ये भीषण आग, लाखोंचा माल जळून खाक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील केळी संशोधन केंद्रासमोर असलेल्या 'शहजादी डिझायनर' या प्रसिद्ध कपड्यांच्या शोरूममध्ये मंगळवारी पहाटे भीषण आग लागली. या दुर्घटनेत लाखो रुपयांचे कपडे व इतर साहित्य जळून खाक झाले असून, यामध्ये लग्न सोहळ्यासाठी आणलेल्या महागड्या कपड्यांचाही समावेश होता.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना ७ जुलै रोजी पहाटे सुमारे ४ वाजता घडली. अचानक लागलेल्या आगीने काही वेळातच संपूर्ण इमारतीला कवेत घेतले. आगीची तीव्रता इतकी भीषण होती की, शोरूममधील बहुतांश साहित्य जळून राख झाले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, आग आटोक्यात येईपर्यंत शोरूममधील बहुतांश मौल्यवान साहित्याचे मोठे नुकसान झाले होते.

प्राथमिक माहितीनुसार, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, शोरूमचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलीस



या आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी घटनेचा पुढील तपास करत आहेत.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# सचिवांना वठणीवर आणाच!

महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनात घडलेली एक गंभीर घटना लोकशाही व्यवस्थेच्या आरोग्याविषयी अनेक प्रश्न उपस्थित करणारी आहे. सभागृहात महत्त्वाच्या विभागांवरील चर्चा सुरू असताना संबंधित मंत्री आणि वरिष्ठ सचिवच उपस्थित नसल्याची बाब विधानसभा अध्यक्ष मराठी भाषा तज्ज्ञ राहुल नार्वेकर यांनी अत्यंत तीव्र शब्दांत मांडली. तब्बल ११० सचिव शासनाकडून नियमित वेतन घेत असताना त्यांपैकी चारजणही सभागृहात उपस्थित नसल्याची नोंद अत्यंत धक्कादायक आहे. यापेक्षा मोठा विरोधाभास कोणता असू शकतो? जनतेच्या करातून लाखो रुपयांचे वेतन घेणारे आणि सर्व प्रकारच्या व्हीआयपी सुविधा घेणारे अधिकारी आणि मंत्री जर आपल्या मूलभूत घटनात्मक जबाबदारीपासून दूर राहत असतील, तर त्यांना केवळ तोंडी समज देऊन चालणार नाही. आता त्यांच्यावर आर्थिक आणि प्रशासकीय दंडात्मक कारवाई करण्याची वेळ आली आहे. अशा लोकांच्या माहिती पुस्तिकेमध्ये लाल अक्षरांमध्ये शेरा लिहून यांची पेन्शन बंद करणे यासारखी कार्यवाही देखील केली जाणे गरजेचे आहे. वातानुकूलित मानसिक अवस्थेत काम (न)करणारे लोक जनतेला तर सोडाच परंतु नेत्यांनासुद्धा सन्मान देईनासे झाले आहेत. अशांना त्यांची जागा दाखवून देणे आता काळाची गरज झाली आहे. विधानसभा हे राज्यातील सर्वोच्च लोकशाही व्यासपीठ आहे. येथे लोकप्रतिनिधी जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करतात, शासनाकडून उत्तरे मागतात आणि प्रशासनाला जबाबदार धरतात. अशा वेळी संबंधित मंत्री आणि विभागीय सचिव उपस्थित नसतील, तर चर्चेचा उद्देशच निष्फळ ठरतो. जनतेच्या समस्या ऐकून त्यावर तत्काळ भूमिका मांडण्याऐवजी रिकाम्या खुर्च्या दिसत असतील, तर तो केवळ सभागृहाचाच नव्हे तर जनतेच्या विश्वासाचाही अपमान आहे. विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या आक्षेपानंतर विधानसभा अध्यक्षांनी मुख्य सचिवांना तातडीने सभागृहात हजर राहण्याचे आदेश दिले. तसेच यापुढे संबंधित विभागावरील चर्चा असताना मंत्री आणि सचिव उपस्थित राहिले नाहीत, तर सभागृह दिवसभरासाठी तहकूब करण्याचा इशाराही दिला. अध्यक्षांची ही भूमिका निश्चितच स्वागतार्ह आहे; मात्र सभागृहाचे कामकाज बंद केल्याने या सचिवांचे काही नुकसान होणार नाही. उलट ते उपहारगृहामध्ये जाऊन फुकटचे चहा आणि बिस्कीट, समोसे खाण्यास मोकळे होतील. म्हणून या ठिकाणी केवळ इशारे देऊन परिस्थिती बदलणार नाही. तर नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रत्यक्ष कारवाई झाली तरच प्रशासनाला शिस्त लागेल. आज सरकारी अधिकारी आणि मंत्री वेळेवर कार्यालयात नसणे, बैठका टाळणे किंवा जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करणे या गोष्टी सामान्य झाल्या आहेत. यामुळे प्रशासनाची कार्यक्षमता कमी होते आणि सामान्य नागरिकांना त्याचा मोठा फटका बसतो. विधानसभेतील अनुपस्थिती ही या बेफिकीरीचीच पुढची पायरी आहे. त्यामुळे अशा प्रकरणांकडे दुर्लक्ष करण्याची चूक सरकारने करू नये. यासाठी स्पष्ट आणि कठोर नियमांची आवश्यकता आहे. ज्या दिवशी संबंधित विभागावरील चर्चा असेल आणि मंत्री अथवा सचिव विनाकारण अनुपस्थित राहतील, त्या दिवसाचे वेतन कापले पाहिजे. वारंवार अनुपस्थिती आढळल्यास त्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालात त्याची नोंद व्हावी. सचिवांवर विभागीय चौकशी, तर मंत्र्यांवर मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाने शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद केली पाहिजे. लोकप्रतिनिधींना सभागृहातील उपस्थितीचे महत्त्व जसे आहे, तसेच मंत्र्यांनाही त्याची सक्ती असली पाहिजे. खासगी क्षेत्रात कर्मचारी विनाकारण अनुपस्थित राहिला, तर त्याचा पगार कापला जातो किंवा त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई होते. मग सार्वजनिक पैशातून वेतन घेणाऱ्या मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी वेगळे निकष का असावेत? लोकशाहीत कोणालाही जबाबदारीपासून सूट असू शकत नाही. उलट, उच्च पदावरील व्यक्तींनीच आदर्श निर्माण करण्याची अपेक्षा असते. विधानसभेतील प्रत्येक मिनिटाला आर्थिक मूल्य असते. अधिवेशन चालविण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. अशा वेळी मंत्री किंवा सचिव अनुपस्थित असल्यामुळे चर्चा रखडणे, प्रश्न अनुत्तरित राहणे किंवा कामकाज तहकूब होणे म्हणजे सार्वजनिक पैशाची उधळपट्टी होय. या नुकसानीची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी संबंधित व्यक्तींवर निश्चित केली पाहिजे. लोकशाही केवळ निवडणुकांनी टिकत नाही; ती उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि शिस्त यांवर उभी असते. विधानसभेचा आदर राखणे ही प्रत्येक मंत्री आणि अधिकाऱ्याची घटनात्मक जबाबदारी आहे. त्यामुळे केवळ सूचना किंवा ताकीद न देता, विनाकारण अनुपस्थित राहणाऱ्या मंत्री आणि सचिव यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई करणे आणि अशा घटनांची सार्वजनिक नोंद ठेवणे ही काळाची गरज आहे. शासनाने याबाबत कठोर धोरण स्वीकारले, तरच विधानसभेचा सन्मान टिकेल, प्रशासन अधिक जबाबदार बनेल आणि जनतेचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल.

# लिट्ल मास्टरला वाढदिवसाच्या शुभेच्छा!



क्रिकेट हा आज सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे. भारत हा आज क्रिकेटमधील दादा संघ आहे मात्र सत्तरच्या दशकापर्यंत भारत हा क्रिकेटमधील लिंबूटिंबू संघ समजला जात होता. त्या काळी फक्त कसोटी क्रिकेट खेळले जायचे. भारताने कसोटी अनिर्णीत राखली तरी ती मोठी बातमी असायची. भारताने कसोटीत विजय मिळवला ही बातमी तर दुर्मिळ असायची. भारताला जो विजय मिळायचा तो अर्थात भारतातच मिळायचा. भारताबाहेर परदेशात विजय मिळणे ही अशक्यप्राय गोष्ट समजली जायची.

इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज हे त्या काळातील दादा संघ. त्यांना त्यांच्या देशात जाऊन हरवायचे ही अशक्यप्राय गोष्ट समजली जायची. अशीच अशक्यप्राय गोष्ट भारताने शक्य केली ती १९७१ साली. १९७१ साली भारताचा संघ वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर गेला होता. त्या संघात एक छोट्या चणीचा मराठी मुलगा भारतीय संघात प्रथमच खेळत होता. त्याची ती पहिलीच कसोटी मालिका. समोर वेस्ट इंडिजच्या वेगवान गोलंदाजांचा तोफखाना. हा छोट्या चणीचा मुलगा सलामीला खेळायला गेला. नुसताच खेळायला गेला नाही तर तो खेळला, असा खेळला की त्याने आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेत विश्वविक्रम केला. आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेत ते ही वेस्ट इंडिजच्या तोफखान्यासमोर त्याने विक्रमी ७७४ धावा काढल्या. त्याचा हा विश्वविक्रम अजूनही कोणत्या खेळाडूला मोडता आला नाही हे विशेष. त्याच्या या विक्रमी फलंदाजीने भारताने पहिल्यांदाच वेस्ट इंडिजला वेस्ट इंडिजमध्ये हरवले आणि या छोट्या चणीच्या मराठी मुलाची दखल जगाने घेतली.

आपल्या पहिल्याच मालिकेत विक्रमी धावा काढणारा हा मुलगा होता सुनील मनोहर गावस्कर. हो तोच सुनील गावस्कर जो पुढे जाऊन भारतीय संघाचा आधारस्तंभ बनला. ज्याने अनेक विश्वविक्रमांना गवसणी घातली. ज्याने डॉन ब्रॅडमन यांच्या २९ शतकांच्या शतकी खेळीचा विक्रम मोडून ३४ शतके काढली. कसोटी क्रिकेटमध्ये दहा हजार धावांचा टप्पा पार करणारा जो पहिला खेळाडू ठरला. ज्याने आपल्या देशाला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले त्याच सुनील गावस्कर यांचा आज ७७ वा वाढदिवस. १० जुलै १९४९ रोजी मुंबईत जन्मलेले सुनील गावस्कर हे क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोत्तम आघाडीचे फलंदाज म्हणून ओळखले जातात. १९७१ ते १९८७ असे सतरा वर्ष त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले या दरम्यान त्यांनी १२५ कसोटी सामन्यात ५१.१२ च्या सरासरीने १०,१२२ धावा काढल्या. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज, पाकिस्तान, न्यूझीलंड अशा सर्वच संघाविरुद्ध त्यांनी खोऱ्याने धावा काढल्या. त्या काळातील गोलंदाज आजच्या सारखे नव्हते.

आग ओकणारे गोलंदाज होते. वेस्ट इंडीजचे अँडी रॉबर्ट्स, जोएल गार्नर, माल्कम मार्शल, मायकल होल्डींग, पॅट्रिक पॅटरसन, इंग्लंडचे बॉब विलिस, जॉन स्नो, इयान बॉथम, पाकिस्तानचे इम्रान खान, सरफराज खान, ऑस्ट्रेलियाचे जेफ थॉमसन, डेनिस लिली केवळ नाव घेतले तरी थरकाप उडतो. हे गोलंदाज नव्हते तर फलंदाजांचे कर्दनकाळ होते. त्यांच्या समोर धावा काढणे तर दूरच पण उभे राहणे देखील मुश्कील होते. अशा खुंखार गोलंदाजांसमोर सुनील गावस्कर खोऱ्याने धावा काढत असे ते त्यांच्या तंत्रशुद्ध फलंदाजीच्या जोरावर. सुनील गावस्कर यांची गणना क्रिकेटच्या इतिहासात सर्वात तंत्रशुद्ध फलंदाज अशी केली जाते. ते फलंदाजीस उतरत तेंव्हा पायाला पॅड आणि हातात ग्लोज एव्हढेच सुरक्षेचे साधने घालून. सुनील गावस्कर यांनी हेल्मेट कधीही वापरले नाही ते कायम डोक्यावर स्कल कॅप घालायचे. स्कल कॅप घालूनच त्यांनी त्या काळातील वेगवान गोलंदाजांचा सामना केला आणि खोऱ्याने धावा काढल्या. या दरम्यान त्यांना लिटल मास्टर पदवी मिळाली.

आजही त्यांच्या नावापुढे लिटिल मास्टर असेच लिहिले जाते. या दरम्यान त्यांनी भारतीय संघाचे कर्णधारपदही सांभाळले. १९८३ चा विश्वचषक जिंकून देण्यातही त्यांचा मोलाचं वाटा होता. ते केवळ उत्कृष्ट फलंदाजच नव्हते तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षकी होते. त्यांनी कसोटीत १०० हून अधिक झेल टिपले. यष्टिरक्षक सोडून कसोटीत १०० हून अधिक झेल घेणारा पहिला भारतीय होण्याचा मान त्यांनाच मिळाला. कसोटीतील त्यांच्या अद्वितीय कामगिरीमुळे १९८० मध्ये त्यांना विस्डेन या क्रिकेटमधील प्रसिद्ध मासिका तर्फे सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून गौरविण्यात आले. त्यांच्या क्रिकेटमधील कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. निवृत्तीनंतर त्यांनी सनी डेज, रन्स अन् रुईंस व वन डे वंडर ही तीन पुस्तके लिहिली. आज ते समालोचन आणि स्तंभलेखन करतात. आज त्यांचा ७७ वा वाढदिवस. सुनील गावस्कर यांना ७७ व्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! त्यांना निरोगी आयुष्य लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# पावसात एकदा तरी भिजावे!



पावसाळा. पावसाळा कुणाला आवडतो तर कुणाला अजिबात आवडत नाही. कारण पावसाळ्यात सतत पाऊस पडत असतो. त्यातच लहान मुलं बाहेर निघून पावसात भिजलीच तर आई वडील सारखे ओरडत असतात. म्हणत असतात की बाहेर निघू नकोस. पावसात भिजशील. अन् तेच घडतंही. बाहेर पावसात निघालो आणि भिजलोच तर सर्दी पडलं होतं आणि फालतूचा खर्च मायबापांवर पडतो. जे काबाडकष्ट करुन पैसे मिळवत असतात.

पावसाळ्याबद्दल सांगायचं झाल्यास कालही आम्ही पावसात भिजत होतो. आमचा जन्म ग्रामीण भागातील. आमचं गाव ग्रामीण असल्यानं त्या काळात गावात रस्तेही नव्हतेच. शिवाय गावात एक शाळा होती. ती घरापासून थोडी लांबच होती. तसं पाहिल्यास जास्त रहदारीही नव्हतीच. मधली सुट्टी शाळेला व्हायची. तेव्हा आम्ही घरी जेवायला यायचो. त्यातच दुपारी पाऊस आला तर मग आमची मजाच मजा. आम्हाला पावसाची चिंता वाटायची नाही. उलट मजाच वाटायची. मग आम्ही शाळेत गेलोच आणि मधली सुट्टी झालीच तर आमच्या बाईला न घाबरता चक्क पावसात घराकडे त्या तेवढ्या पावसात धुम्म पळत सुटायचो. अन् घरी गेल्यावर आई ओरडायची. केसं पुसून द्यायची. म्हणायची की असं येत जावू नकोस. सर्दी होईल. आजारी पडशील. परंतु ते बोलणं मनावर घेत नव्हतो आम्ही. कारण त्यावेळेस आजार आमच्या पाचवीलाही शिवत नव्हताच असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. याचा अर्थ आम्हाला आजार होत नसेल काय? आजार होतच होता. सर्दी सदोदीत राहायची आणि ती सर्वांनाच असायची. त्यामुळंच त्याचा बाऊ वाटायचा नाही. तशी आई नेहमीच म्हणायची. शेंबूड काढून टाकायचा. रुमालानं पुसायचा. परंतु ऐकतो कोण? सारखं सर्वांचं शाळेत फुरक फुरक करणं सुरु असायचं. परंतु तसं असलं तरी डॉक्टरचं तोंड पाहात नव्हतो आम्ही वर्ष न् वर्ष.

शाळेच्या मधल्या सुट्टीत जेवणाला घरी आलोच तर आई जेवन झाल्यावर कपडे बदलवून पाऊस येत असेल तर छत्री द्यायची व आम्ही ती छत्री घेवून शाळेत निघायचो. परंतु ती छत्री आईला दाखविण्यापुरतीच असायची. एकदा काय घरातून बाहेर पडलोच की बस. आम्ही ती छत्री बंद करीत असू आणि बंद्या पावसात पावसाची मजा घेत धावत पळत शाळेत जात असू. तशी आमची बाई देखील छानच होती. ती आम्ही भिजलेले शाळेत गेलोच तर आम्हाला सुट्टी द्यायची. मग संपूर्ण दिवस आनंदात जायचा. त्यामुळंच पावसात भिजण्याचा आनंद काही औरच असायचा.


आम्ही पावसात भिजत असू. अलबत पाण्यात उतरत असू आई ओझल होताच. त्यावेळेस आई म्हणायची, बापू, पाण्यात जळू असते. ती रक्त पिते. ती एकदा का अंगाला चिकटली की पुर्ण रक्त पिल्याशिवाय सोडत नाही. मग माणूस मरतो. तेव्हा थोडीफार भीती वाटायची. परंतु पुढल्याच क्षणी मित्र म्हणायचे, अरे, जळू काही करीत नाही. ती अंगाला चिकटलीच तर तिच्या तोंडावर मीठ टाकायचं. ती पळते. असं मित्रानं सांगताच आम्ही आमच्या खिशात मीठ ठेवत पावसात फिरत होतो. त्यातच पावसाची आम्हाला अजिबात भीती वाटत नव्हती.

तो पाऊस...तो पाऊस आलाच तर रस्त्यारस्त्यावर पाणी गोळा व्हायचं. त्यात पाय बुडायचे. परंतु त्या पाण्यातून घोड्यासारखं धावताना जी मजा येत असे, ती आता येत नाही. भीती वाटायची सापाची. परंतु तिही भीती कालांतरानं लहानपणी नष्ट झाली होती. पावसाळ्यात गावात लपायला येणारी माकडं बंद पावसात हाकलून लावायला मजा यायची. ती आता येत नाही. व्यतिरिक्त अलिकडचे आजार हे लहान मुलांच्या पाचवीलाच पुजलेले दिसत असतात. शिवाय साधी सर्दी जरी झाली तरी आपल्या मुलाचा आजार वाढू नये. म्हणून त्याला ताबडतोब रुग्णालयात नेणारे पालक आहेत. त्याचं कारण म्हणजे आज साधी सर्दीही जीवघेण्या स्वरुपाची ठरु शकते. तसं काल नव्हतं.

आम्हाला पावसाळा आवडायचा. कारण आम्हाला त्या काळात पावसातच खेळायला मजा यायची. आजही पावसाळा आवडतो. कारण आजचा पावसाळा आम्हाला अन्नधान्य पुरवतो. अंगात घालायला कापड देतो. राहायला एक लहानसं घरही देतो. परंतु पाऊस जर आलाच नाही तर झाडं दिसणार नाही. सगळीकडे हिरवळ दिसणार नाही. अन्नधान्य पिकणार नाही. कापूस पिकणार नाही. मग पोटाला अन्न, घालायला कापड आणि राहायला घरही कदाचीत नशिबात नसेल, अशी आपली स्थिती होवून जाईल. यात शंका नाही. तेव्हा सर्वांनाच सांगावेसे वाटते की पावसाला कोणीही हिणवू नये. त्याचं स्वागतच करावे. तो जर आला तर त्याला अलगद ओठावर टिपावं. त्याच्या पडणाऱ्या सरीत स्वतःला न्हाऊन टाकावं. तसेच ते पावसाचे थेंब न् थेंब अलगद गिळावे. ज्यातून आपलीच रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकेल. म्हणतात ना की पाऊस जर अंगावर गेलाच तर शरीरातील उष्णता पुर्णतः निघून जाते व आपण वर्षभर आजारी पडत नाही. अगदी तसंच आपण पावसाची तमा न बाळगता वागावं. एकदा तरी पावसात पूर्ण भिजावं आणि पावसाचा आनंद घ्यावा म्हणजे झालं.

**–अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# समाधान, शांती आणि आरोग्य...



मानवी जीवनात सुख, समाधान आणि मानसिक शांतता यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजचा माणूस सुखाच्या शोधात सतत धावत आहे. अधिक पैसा, मोठे घर, महागड्या वस्तू यांनाच सुख समजले जातात. परंतु खरे सुख साधेपणात आणि समाधानात दडलेले असते. साधे जीवन जगणारा माणूस आनंदी, निरोगी आणि शांत राहतो. अनेक थोर व्यक्तींनी साधेपणाने जीवन जगून समाजाला आदर्श घालून दिला. साधे जीवन म्हणजे गरजा मर्यादित ठेवणे, अनावश्यक खर्च टाळणे आणि प्रामाणिकपणे जीवन जगणे.

साध्या जीवनामुळे मनावर ताण कमी येतो. कमी अपेक्षा ठेवल्यास माणूस जे आहे त्यात समाधान मानतो. त्यामुळे मानसिक शांती मिळते. नियमित दिनचर्या, साधा आहार आणि व्यायाम यांमुळे शरीर निरोगी राहते. माणसामध्ये नम्रता, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि प्रेम या गुणांचा विकास होतो. तो इतरांना मदत करण्यासही नेहमी तयार असतो. त्यामुळे समाजातही चांगले संबंध निर्माण होतात. जीवनातील खरा आनंद हा भौतिक सुखांमध्ये नसून साधेपणा, समाधान आणि चांगल्या विचारांमध्ये आहे. साधेपणाने जगणारी व्यक्ती निसर्गाच्या सान्निध्यात, कुटुंबाच्या प्रेमात आणि चांगल्या नातेसंबंधांत खरे समाधान शोधते. प्रत्येकाने आपल्या जीवनात साधेपणाचा स्वीकार करावा.

साधेपणामुळे माणूस इतरांच्या दुःखाची जाणीव ठेवतो, समाजाशी जोडला जातो आणि पर्यावरणाचेही संरक्षण करण्यास हातभार लावतो. साधेपणा हा जीवनातील खरा आनंद आणि समाधान मिळवून देणारा मार्ग आहे. तो आपल्याला स्वार्थ, दिखाऊपणा आणि अनावश्यक स्पर्धेपासून दूर ठेवतो. साधे जीवन जगणारी व्यक्ती कमी साधनांमध्येही आनंदी राहते आणि इतरांनाही आनंद देण्याचा प्रयत्न करते. शेवटी असे म्हणता येईल की, खरे सुख संपत्तीत नसून समाधानात असतो साधेपणा, प्रामाणिकपणा आणि सकारात्मक विचार यांच्या आधारावर जगलेले जीवन खऱ्या अर्थाने सुखी आणि समाधानी असते. म्हणून प्रत्येकाने साधे जीवन, उच्च विचार हे तत्त्व अंगीकारून आनंदी, शांत आणि अर्थपूर्ण जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. साधे जीवन जगून उच्च विचार जोपासल्यास वैयक्तिक तसेच सामाजिक जीवन अधिक आनंदी, शांत आणि निरोगी होईल.

**–श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# शांत, संयमी व्यक्तिमत्त्व: व्यंकटराव पाटील खतगावकर

बिलोली तालुक्यातील खतगाव येथील वारकरी संप्रदायाचा वारसा असलेल्या श्री व्यंकटराव व श्रीमती विठ्ठाबाई या दाम्पत्याच्या पोटी जन्माला आलेल्या व्यंकट नामदेवराव पाटील खतगावकर यांचा आज ५० वा वाढदिवस. शांत, संयमी, निगर्वी आणि प्रेमळ व मित्तभाषी स्वभाव असलेले व्यंकटराव पाटील खतगावकर हे खतगाव येथील मंजुळाबाई हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजीराव पाटील खतगावकर यांचे धाकटे बंधू व्यंकटराव पाटील खतगावकर. एखाद्याच्या नात्यातील एखादी व्यक्ती उच्च पदावर असली म्हणजे त्यांच्या अवतीभोवती असलेली नात्यागोत्यातील माणसे कशी सैरभैर आणि बिनधास्त वागतात हे अनेक ठिकाणी पाहावयास मिळते. परंतु व्यंकटराव पाटील खतगावकर यांचे वर्तन तसे वेगळे आहे. त्यांना आपले मोठे बंधू उच्च पदावर आहेत आणि आपणास त्यांचा वरदहस्त आहे म्हणून कसेही वागावे ही शिकवण त्यांच्या अंगी अजिबात नाही हे निक्षूण सांगावे वाटते.

व्यंकटराव पाटील खतगावकर यांचा स्वभाव अतिशय नम्र, विनयशील वृत्ती.



बालाजीराव पाटील खतगावकर यांच्याकडे एखाद व्यक्ती काम घेऊन आल्यानंतर सर्वप्रथम भेट होते ती व्यंकटराव पाटील खतगावकर यांची. तेव्हा व्यंकटराव पाटील हे अतिशय नम्रपणे त्या व्यक्तीशी संवाद साधून बालाजीराव पाटील यांच्याशी भेट करून दिल्यानंतर त्या व्यक्तीशी आस्तेवाईकपणे काम झाले की नाही या संदर्भात चौकशी करतात. एकूणच आपल्याकडे आलेला व्यक्ती त्यांच्या परिवाराशी एकरूप झाल्याशिवाय राहत नाही. कारण त्यांच्या कुटुंबियांना माणुसकीचे धडे आई-वडिलांकडूनच मिळाले आहेत, असे त्यांच्या कुटुंबातील सहवासानंतर अनुभवयास येते.

उच्च शिक्षित व्यंकटराव पाटील खतगावकर यांना अध्ययन आणि अध्यापनाबरोबरच खेळाविषयीची प्रचंड आवड आहे. म्हणून ते आज मंजुळाबाई हायस्कूलमध्ये विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून नावलौकिकास प्राप्त झाले आहेत. शिक्षण आणि समाजकारणाकडून राजकारण असा त्यांचा प्रवास आहे.

हल्ली त्यांनी समाजकारण करीत राजकारणाकडे पाऊल टाकले आहे. राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेवून शिवसेनेची ताकद वाढविण्याचा निर्धार करून बिलोली, देगलूर आणि मुखेड तालुक्यात गाव तिथे शिवसेनेची शाखा निर्माण करण्याचा त्यांनी चंग बांधला आहे. व्यंकटराव पाटील खतगावकर यांच्या सामाजिक कार्याची नोंद घेऊन सध्या शिवसेनेच्या उपजिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी त्यांच्यावर पक्षश्रेष्ठींनी सोपवली आहे. ते अतिशय नेटाने कार्य करीत आहेत. आपल्या कार्यक्षेत्रातील गरजूंच्या समस्या जाणून घेऊन त्यांना मदत करण्यात व्यंकटराव पाटील खतगावकर हे सध्या आघाडीवर आहेत. त्यांचा पुढील सामाजिक आणि राजकीय प्रवास सुखमय आणि प्रगतीशील होवो हीच त्यांच्या जन्मदिनानिमित्त मनोकामना.

**–किशन बुद्धेवार**
खतगाव, ता. बिलोली, जि. नांदेड
मो. ९३५९००२१५०

# शिक्षकेत्तर भरती प्रक्रियेची पडताळणी करूनच निर्णय घेणार -शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदभरती संदर्भातील सुरू असलेल्या प्रक्रियेची संपूर्ण पडताळणी करूनच पुढील निर्णय घेतला जाईल. तसेच बदलत्या शैक्षणिक व प्रशासकीय गरजांनुसार सेवा नियम सुधारित करून भविष्यातील भरती प्रक्रिया नव्या निकषांनुसार राबविण्यात येईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

मंत्री भुसे यांनी सांगितले, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतिबंध लागू केला असून त्यानुसार संभाव्य वेतनपदे, अतिरिक्त पदांचा समावेश, अटी-शर्ती आणि विहित कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. शिक्षकेतर संवर्गातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेत पदभरती करण्याचा निर्णय घेण्यात आला असून या प्रक्रियेतील सर्व बाबींची खातरजमा करूनच योग्य निर्णय घेतला जाईल. यासंदर्भातील कार्यवाही आणि नियमावलीची अंमलबजावणी तपासून पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जुन्या सेवा नियमात सुधारणा करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे सांगत भविष्यातील गरजा लक्षात घेऊन सुधारित सेवा नियमांच्या आधारे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया राबविण्यात येईल असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

सदस्य सुनील कर्जतकर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य प्रवीण दरेकर, अनिकेत तटकरे, श्रीकांत भारतीय, डॉ. परिणय फुके, जयंत आसगावकर, विक्रम काळे, बच्चू कडू यांनी सहभाग घेतला.

# कामात मागे असलेल्या बीएलओ यांच्या कामाची जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी; कामात गती आणण्याचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व त्रुटीमुक्त करण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत प्रत्येक पात्र नागरिकाची मतदार म्हणून नोंद सुनिश्चित करणे, मृत अथवा स्थलांतरित मतदारांची माहिती अद्ययावत करणे तसेच मतदारांच्या तपशीलांचे डिजिटायझेशन करण्यात येत आहे.



या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी उस्मानशाही मिल, सिडको परिसरातील प्रभाग क्रमांक ६ मधील कामात अपेक्षित प्रगती नसलेल्या २० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व त्यांच्या पर्यवेक्षकांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी पुढील दोन दिवसांत कामात लक्षणीय प्रगती करण्याचे निर्देश देत कामात निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला.

बैठकीनंतर जिल्हाधिकारी यांनी प्रत्यक्ष बीएलओ यांच्या कामाची पाहणी केली. त्यांनी मतदार गणना फॉर्म स्वतः भरून घेण्यास सांगितला. तसेच मोबाईल ॲपद्वारे त्याचे तत्काळ डिजिटायझेशन करून संपूर्ण प्रक्रियेची प्रत्यक्ष पडताळणी केली. यावेळी त्यांनी भविष्यात कोणत्याही मतदान केंद्र क्षेत्राला अचानक भेट देऊन बीएलओ प्रत्यक्ष काम कसे करत आहेत, याची तपासणी करण्यात येईल. भेटीदरम्यान संबंधित बीएलओ किंवा त्यांचे सहायक अनुपस्थित आढळल्यास अथवा कामात समाधानकारक प्रगती दिसून न आल्यास नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

या पाहणीवेळी उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी (०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ) संजय वारकड, सहायक मतदार नोंदणी अधिकारी स्वामी व सानप तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले की, मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण हा केवळ प्रशासकीय उपक्रम नसून लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम आहे. अचूक, अद्ययावत व विश्वासार्ह मतदार यादी ही मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रियेचा भक्कम पाया आहे. त्यामुळे सर्व पात्र नागरिकांनी आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून देत या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा आणि निवडणूक यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# गुरुद्वारा सचखंड बोर्डाच्या संत बाबा जोगिंदरसिंघ मोनी शिवणकला केंद्राच्यावतीने शिलाईचे प्रशस्ती पत्र वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)–** गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड द्वारा संचलित संत बाबा जोगिंदर सिंघजी मोनी शिवणकला केंद्र येथे शिलाई प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींना गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे अधीक्षक रविंदरसिंघ कपूर यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.



गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ यांच्या निर्देशानुसार उत्तम तथा आधुनिक शिवणकला शिकण्या-करिता नवीन व आधुनिक शिलाई मशीन खरेदी करण्यात आल्या. यावेळी अधीक्षक यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. तसेच भविष्यातही समाजातील महिलांनी या संधीचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २०२६-२०२७ मध्ये देखील संत बाबा जोगिंदरसिंघजी मोनी शिवण कला केंद्राच्या प्रशिक्षणासाठी दि. १५ जुलै २०२६ पासून अर्ज स्वीकारण्यास सुरूवात केली जाणार आहे. या शिलाई केंद्रामध्ये मुलींना मोफत शिलाई प्रशिक्षण देण्यात येत असून, केंद्राची स्वतःची भव्य ईमारत, अनुभवी प्रशिक्षक वर्ग व आधुनिक शिलाई मशिनींसोबत उत्तम प्रशिक्षण दिले जात आहे. तरी इच्छुक महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन गुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक यांनी केले.

ज्या गरजू महिलांना आपले स्वतःचे शिलाई केंद्र किंवा स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा आहे अशा महिलांनी उपयुक्त कागदपत्र सादर केल्यास त्यांना बँकेमार्फत कर्ज अथवा शिलाई मशीन उपलब्ध करून देण्यासाठी गुरुद्वारा सचखंड बोर्डाकडून शिफारस करण्यात येईल, असेही सांगितले.

यावेळी गुरुद्वारा बोर्डाचे सहा. अधिक्षक जैमल सिंघ ढिल्लो, सहा. अधीक्षक बलविंदरसिंघ फौजी, सतनामसिंघ रागी, जसपालसिंघ नगारची तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती प्रकाश कौर लष्करे यांची उपस्थिती होती.

या शिलाई केंद्राच्या सर्व विद्यार्थिनींद्वारा आधुनिक मशिनिंच्या तरतुदीसाठी प्रशासक साहेबांचा विशेष धन्यवाद व्यक्त केला असून विद्यार्थिनींच्या प्रशिक्षणात फायदा झाला असे त्यांचे म्हणने आहे. हा कार्यक्रम गुरुद्वारा सचखंड साहेब परिसर सिवनकला केंद्रामध्ये सर्व भगिनींना अल्पोहार देउन पार पाडण्यात आला. ह्या कार्यक्रमा मध्ये सर्व प्रशिक्षणार्थी संस्थेच्या प्राचार्या, प्रशासक साहेबांचे स्वीय सेवक सौ. बबीता कौर चाहेल (कजऊ) सिवनकला केंद्र, सुरिंदर कौर गाडीवाले,किरणजीत कौर कारागीर, पुजा कौर लांगरी, गीता कौर पुजारी व इतर कर्मचारी तथा प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' व 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' अंतर्गत अल्पवयीन मुलीची सुटका व चोरीच्या गुन्ह्यांवर कारवाई

## नांदेड विभागाच्या रेल्वे सुरक्षा दलाची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा दलाने ६ जुलै २०२६ रोजी जालना व परभणी रेल्वे स्थानकांवर राबविलेल्या यशस्वी कारवायांद्वारे प्रवासी सुरक्षा व बालसंरक्षणाप्रती आपली कटिबद्धता पुन्हा एकदा सिद्ध केली.

'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत जालना रेल्वे सुरक्षा दलाच्या महिला कॉन्स्टेबल सौ. कोमल बडोगे यांनी जालना रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर गस्त घालत असताना संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला पाहिले. सदर मुलगी घरातून पळून आली असल्याचा संशय आल्याने तिला सुरक्षितपणे रेल्वे सुरक्षा दलाच्या पोस्टवर आणून समुपदेशन व चौकशी करण्यात आली.



चौकशीदरम्यान १५ वर्षीय मुलीने पालकांना कोणतीही माहिती न देता घरातून निघून जालना रेल्वे स्थानकावर आल्याचे सांगितले. रेल्वे सुरक्षा दलाने तत्काळ चाइल्ड हेल्पलाईन (१०९८) तसेच मुलीच्या पालकांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर सरकारी रेल्वे पोलीस व स्थानक प्रशासनाच्या उपस्थितीत आवश्यक कार्यवाही पूर्ण करून मुलीला सुरक्षित अवस्थेत चाइल्ड हेल्प डेस्कच्या प्रतिनिधींच्या स्वाधीन करण्यात आले.

'ऑपरेशन यात्री सुरक्षा' अंतर्गत आणखी एका महत्त्वपूर्ण कारवाईत रेल्वे सुरक्षा दलाच्या गुन्हे गुप्तवार्ता शाखा नांदेड व सरकारी रेल्वे पोलीस, परभणी यांच्या संयुक्त पथकाने मोबाईल चोरीच्या प्रकरणातील एका आरोपीला अटक केली.

सायबर तांत्रिक माहितीच्या आधारे संयुक्त पथकाने ६ जुलै २०२६ रोजी परभणी येथे आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून नोव्हेंबर २०२५ मध्ये गाडी क्रमांक १७२५३ गुंटूर एक्सप्रेसमधून चोरीला गेलेला रु. १५,९९९ किमतीचा सॅमसंग मोबाईल जप्त करण्यात आला. आरोपी व जप्त मोबाईल पुढील कायदेशीर कारवाईसाठी सरकारी रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. याच 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करत रेल्वे सुरक्षा दलाच्या CIB, नांदेड व सरकारी रेल्वे पोलीस, परभणी यांच्या संयुक्त पथकाने परभणी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर गाडी क्रमांक १७६६२ नगरसूल-काचीगुडा एक्सप्रेस थांबलेली असताना चार संशयित चोरट्यांना ताब्यात घेतले.

# एमकेसीएलच्या रौप्य महोत्सवी वर्षात शासनाचा स्कॉच अवार्ड पुरस्कार जाहीर -विभागीय समन्वयक महेश पत्रिके यांची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** डिजिटल परिवर्तन सामाजिक विकास आणि कौशल्यवृद्धी क्षेत्रातील उल्लेखनीय उपक्रमाचा गौरव करणारा स्कॉच अवार्ड राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत मानाचा पुरस्कार मानला जातो. या पुरस्कारामुळे महाराष्ट्रातील डिजिटल साक्षरतेच्या चळवळीला नवी ऊर्जा मिळाली असून, राज्यभरातील ५ हजारांहून अधिक एमएस-सीआयटी प्रशिक्षण केंद्रामध्ये केंद्र संचालक प्रशिक्षक आणि विद्यार्थ्यांनी यांचे स्वागत केले आहे, अशी माहिती विभागीय समन्वयक महेश पत्रिके यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.



यावेळी ते म्हणाले की, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितने गेल्या २५ वर्षात १.७ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांना व नागरिकांना एमएस-सीआयटीद्वारे डिजिटल साक्षर केले आहे. एमएस-सीआयटीला डिजिटल लिटरेसी श्रेणीतील देशातील प्रतिष्ठित स्कॉच अवार्ड प्राप्त झाला असून, महाराष्ट्राच्या डिजिटल शिक्षण क्षेत्रासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. कोच अवार्ड हा डिजिटल परिवर्तन कौशल्य विकास आणि नागरिक सक्षमीकरण क्षेत्रातील देशातील मानाचा पुरस्कार मानला जातो. या सन्मानाबद्दल एमकेसीएलचे व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे यांनी हा पुरस्कार विद्यार्थी पालक अधिकृत शिक्षण केंद्र प्रशिक्षक नेटवर्क पार्टनर्स एमएस बीटी इ. महाराष्ट्र शासन आणि संपूर्ण एमकेसीएल परिवाराच्या संयुक्त प्रयत्नांचे यश असल्याचे सांगितले

रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त एमकेसीएलने आपण करूया महाराष्ट्र ही राज्यव्यापी जनजागृती मोहीम सुरू केली असून सर्वांसाठी मोफत एआय मास्टर क्लास उपलब्ध करून दिला आहे. ही मोहीम २३ जून २०२६ पासून ६० दिवस राज्यभर राबविण्यात येणार आहे. याद्वारे शाळा-महाविद्यालय आणि विविध भागांमध्ये एआयविषयी जनजागृती केली जात आहे. या मोहिमेअंतर्गत डब्ल्यूडब्ल्यू एमएस-सीआयटी डॉट एआय या संकेतस्थळावर नोंदणी करून मोफत एआय मास्टर क्लास उपलब्ध आहे. मास्टर क्लास पूर्ण करणाऱ्यांना एमएस-सीआय टी केंद्रमार्फत प्रमाणपत्र प्रदान केले जाते.

नवीन एआय सक्षम एम. एस. सी .आय. टी. मध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स सायबर सेक्युरिटी डाटा लिटर एसी आणि क्लाऊड कॉम्प्युटिंग यासारख्या आधुनिक विषयांचा समावेश करण्यात आला आहे विद्यार्थ्यांना चार जीपीटी मायक्रोसॉफ्ट को पायलट गुगल जेमिनी कॅन यांच्यासह १२५ हून अधिक आणि २५० पेक्षा अधिक डिजिटल कौशल्यांचा प्रात्यक्षिक दिले जाते.

## भाजपा ओबीसी मोर्चाच्या महानगर सरचिटणीसपदी श्याम नायगावे यांची निवड

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या नांदेड महानगर जिल्हा



सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

नांदेड भाजपा महानगराध्यक्ष अमर राजूरकर यांच्या हस्ते नियुक्तीचे पत्र देण्यात आले. या वेळी ओबीसी मोर्चाचे महानगर अध्यक्ष ॲड. धात्रक व भाजपा नांदेड दक्षिण ग्रामीण तालुकाध्यक्ष विश्वांभर पा. शिंदे व मान्यवर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# पतंजली योग परिवारातर्फे नाईक नगर उद्यानात स्वच्छता अभियान

**नांदेड (प्रतिनिधी)–** पतंजली योग परिवारातर्फे नाईक नगर परिसरातील उद्यानात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात उद्यानात विखुरलेला प्लास्टिक कचरा, रिकाम्या पाण्याच्या बाटल्या, स्नॅक्सची रिकामी पाकिटे, गुटख्याची पाकिटे, खराब चप्पल, कपड्यांचे तुकडे तसेच अन्य टाकाऊ वस्तू गोळा करून घंटागाडीपर्यंत नेण्यात आल्या व त्यांची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.



नाईक नगर परिसरातील हे उद्यान मोठे असून येथे दररोज ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती, लहान मुले तसेच महिला फिरण्यासाठी, व्यायामासाठी आणि उद्यानातील मंदिरात दर्शन व पूजेसाठी येतात. मात्र काही नागरिकांकडून निष्काळजीपणे कचरा टाकला जात असल्याने परिसर अस्वच्छ होत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी पतंजलीचे राज्य प्रभारी अनिल अमृतवार म्हणाले, दुसऱ्याने टाकलेला कचरा उचलणे म्हणजे स्वच्छता अभियान नव्हे, तर स्वतः कचरा न करणे आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, हीच खरी स्वच्छतेची संस्कृती आहे. प्रत्येक नागरिकाने सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

या स्वच्छता अभियानात सर्वश्री सदाशिव बुटले पाटील, देवेश सलगर, अनिल कदम, श्रीराम मोरे, जितेंद्र सांगवीकर, मल्लिकार्जुन कामटेकर यांच्यासह पतंजली योग परिवाराचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# राज्य परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागात ११० शिकाऊ उमेदवारांची भरती

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड विभागामार्फत सन २०२६-२७ या द्वितीय सत्रासाठी विविध व्यवसायांमध्ये १ वर्ष कालावधीसाठी शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ही भरती ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार असून एकूण ११० पदे भरण्यात येणार आहेत. व्यवसायनिहाय पदसंख्या पुढीलप्रमाणे आहे.

मेकॅनिक मोटार व्हेईकल -४०, मेकॅनिक डिझेल -४४, शीट मेटल वर्क्स ८, ऑटो इलेक्ट्रिशियन ०५, मेकॅनिक रेफ्रिजरेशन अँड एअर कंडीशनर २, पेंटर (जनरल) ३, वेल्डर (गॅस अँड इलेक्ट्रिक) ६, टर्नर २ तसेच अभियांत्रिकी पदवी/पदविका २ अशी एकूण १५० पदे आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दिव्यांग उमेदवारांसाठी शिकाऊ उमेदवार कायद्यानुसार जागा आरक्षित राहतील.

आय.टी.आय. किंवा व्होकेशनल अभ्यासक्रम तसेच ऑटो इंजिनिअरिंग टेक्निशियन अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवारांनी प्रथम www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर स्वतःचे नोंदणीकरण करणे आवश्यक आहे. MSRTC Division Nanded या आस्थापनेसाठी ऑनलाईन अर्ज करावा. त्यानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विहित नमुन्यातील छापील अर्ज भरून सादर करणे आवश्यक आहे. विहित नमुन्यातील छापील अर्ज आस्थापना शाखा, विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, असदुल्लाखान टेकडी, रिजनल वर्कशाप समोर, नांदेड येथे दिनांक ८ जुलै ते २८ जुलै २०२६ या कालावधीत (शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व तात्काळ स्वीकारले जातील.

छापील अर्जाची किंमत (जीएसटी सह) खुल्या प्रवर्गासाठी ५९० रुपये असून मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांनी वैध जातीचे प्रमाणपत्र सादर केल्यास २९५ रुपये इतकी राहील. इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित मुदतीत अर्ज सादर करण्याचे आवाहन रा. प. महामंडळ नांदेड विभागामार्फत करण्यात आले आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत मॉडर्नचे यश




**उमरी (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यातर्फे सन २०२६-२७ मध्ये घेण्यात आलेल्या ऑलिंपीयाड स्पर्धा परीक्षेत मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर टाकली आहे.

सदरील स्पर्धा परीक्षेमध्ये इयत्ता ५ वीतून ९ विद्यार्थी पात्र झाले असून इयत्ता ८ वीतील १२ विद्यार्थी पात्र झाले आहेत. इयत्ता ५ वीतील मुक्कावार अमेय संतोष हा विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरला आहे. इयत्ता पहिलीपासून हा विद्यार्थी मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेतो आहे. इयत्ता ८ वीतील विद्यार्थी राजवीर लक्ष्मण पुरोहित हा देखील शिष्यवृत्ती पात्र ठरला असून, तो इयत्ता ५ वीपासून या शाळेत शिक्षण घेत आहे.

मॉडर्नच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखली त्याबद्दल संस्थेच्यावतीने अमेय संतोष मुक्कावार आणि राजवीर लक्ष्मण पुरोहित यांचा माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी आणि शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

यशस्वी विद्यार्थ्यांनी घेतलेले परिश्रम, त्यांच्या आई, वडिलांचे सहकार्य आणि मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या सर्व शिक्षकांनी वेळोवेळी विद्यार्थ्यांना केलेले मार्गदर्शन याचाच परिपाक म्हणजे हे यश असल्याची भावना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी यांनी संबधित विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी व्यक्त केली.

# स्वारातीम विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'वन महोत्सव' व 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत १०० वृक्षांचे वृक्षारोपण

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे शासनाच्या निर्देशानुसार १ ते ७ जुलै 'वन महोत्सव सप्ताह' तसेच 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत विद्यापीठ परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमाचा शुभारंभ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी वड, पिंपळ, चिंच, कडूनिंब आणि करंजी यांसारख्या पर्यावरणपूरक व दीर्घायुषी वृक्षांच्या १०० रोपांचे लागवड करण्यात आली.

कार्यक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी झाडे लावा, झाडे जगवा हा पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला. वृक्ष हे केवळ पर्यावरणाचे संतुलन राखणारे घटक नसून, ती राष्ट्रीय संपत्ती असून, त्यांचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

या वृक्षारोपण कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम व नवसंशोधन साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. नंदकुमार बोधगिरे, डॉ. लीना गोगटे, डॉ. योगिनी सातारकर, डॉ. उषा सांगळे, सहायक कुलसचिव रामदास पेद्देवाड यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि उद्यान विभागाचे कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे विद्यापीठ परिसर अधिक हिरवागार होण्यास हातभार लागणार असून पर्यावरण संवर्धनासाठी समाजात जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

## बांधकाम कामगारांच्या पाल्यांच्या शिष्यवृत्तीसाठी बोनाफाईड प्रमाणपत्र निर्गमित करताना नियमांचे पालन करण्याचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्यांना विविध शैक्षणिक अर्थसहाय्य व शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. सदर योजनांचा लाभ देताना विद्यार्थ्यांचे बोनाफाईड प्रमाणपत्र हा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज आहे. सदरची शिष्यवृत्ती योजना ही प्रथम वर्गापासून ते डिप्लोमा, डिग्री, पोस्ट ग्रॅज्युएशन या वर्गातील बांधकाम कामगार यांच्या पाल्यांना देण्यात येते. अलीकडे काही प्रकरणांमध्ये बनावट/फेरफार केलेली बोनाफाईड प्रमाणपत्रे सादर करून शासनाची फसवणूक करून बांधकाम कामगारांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळविण्याचा प्रयत्न झाल्याचे निदर्शनास आले आहे.

यामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय होण्याबरोबरच पात्र बांधकाम कामगारांच्या पाल्यांऐवजी अपात्र पाल्यांना लाभ मिळण्याची शक्यता निर्माण होत असल्याने सर्व शाळा, कॉलेज, विद्यापीठ आदींनी बोनाफाईड सर्टिफिकेट निर्गमित करताना पुढील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे असे आवाहन असे सहायक कामगार आयुक्त, आशिष ढवळे यांनी केले आहे.

बोनाफाईड प्रमाणपत्र केवळ संस्थेच्या अधिकृत लेटरहेडवरच निर्गमित करावे. प्रमाणपत्रावर निर्गमांक, दिनांक, संस्थेचा शिक्का व प्राचार्य/मुख्याध्यापक/सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणे अनिवार्य राहील. प्रत्येक प्रमाणपत्राला युनिक क्रमांक देण्यात यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

# मोबाइलमध्ये नवा व्हायरस

**गेल्या काही महिन्यांपासून शेकडो अँड्रॉइड यूजर एका नव्या मालवेअरमुळं त्रस्त आहेत. हा नवा मालवेअर एकदा डिलिट केल्यानंतरही फोनमध्ये पुन्हा इन्स्टॉल होत आहे. इतकंच नाही तर स्मार्टफोन फॅक्ट्री रिसेट केल्यानंतरही तो पुन्हा फोनमध्ये येत आहे. एक्सहेल्पर नावाच्या या मालवेअरनं गेल्या सहा महिन्यांत ४५ हजारांहून अधिक अँड्रॉइड डिव्हाइसमध्ये शिरकाव केला आहे. त्यामुळं यूजर त्रस्त आहेत. हा नवा व्हायरस दिवसेंदिवस अधिकच पसरत आहे. एक्सहेल्पर दिवसाला जवळपास १३१ आणि दर महिन्याला सरासरी २४०० अँड्रॉइड डिव्हाइसमध्ये शिरकाव करत आहे. या नव्या व्हायरसमुळं सर्वाधिक भारत, अमेरिका, रशियामधील यूजर त्रस्त आहेत.**




## पैसा कमावण्याचं माध्यम

रिपोर्ट्सनुसार, हे ट्रोझन यूजरची मोठी हानी करत नाही ही एक दिलासा देणारी बाब आहे. मालवेअर बाइट्स आणि सिमॅन्टेकनुसार, या ट्रोझननं आतापर्यंत बहुतांश पॉपअप जाहिराती आणि नोटिफिकेशन स्पॅम दाखवले आहेत. या जाहिराती आणि नोटिफिकेशन यूजरना प्ले स्टोरवर रिडायरेक्ट करतात. तेथे त्यांना अन्य ॲप इन्स्टॉल करण्यासाठी सांगितले जाते. याचाच अर्थ ॲप इन्स्टॉल केल्यास मिळणाऱ्या कमिशनच्या माध्यमातून पैसा कमावतात, असं मानलं जातं. सर्वप्रथम हे ट्रोझन एका ॲपच्या माध्यमातून अँड्रॉइड डिव्हाइसमध्ये ॲक्सेस मिळवतो. त्यानंतर एक्सहेल्पर त्या डिव्हाइसमध्ये स्वतंत्र अशा पद्धतीनं इन्स्टॉल होतं. ज्या ॲपच्या माध्यमातून ते डिव्हाइसमध्ये आलंय ते अनइन्स्टॉल केल्यानंतरही एक्सहेल्पर डिव्हाइसमधून रिमूव्ह होत नाही. डिव्हाइसमध्ये राहून ते पॉपअप आणि नोटिफिकेशन स्पॅम दाखवतं.

## थर्ड पार्टी ॲपच्या माध्यमातून शिरकाव

मालवेअर बाइट्सच्या रिपोर्टनुसार, वेब रिडायरेक्ट हा या मालवेअरचा स्त्रोत आहे. अँड्रॉइड ॲप होस्ट करणाऱ्या वेब पेजवर यूजरना वेब रिडायरेक्टच्या माध्यमातून पाठवलं जातं. प्ले स्टोरच्या बाहेर अनऑफिशियल अँड्रॉइड ॲप्सना कशा प्रकारे साइड लोड करता येईल हे यूजरना या वेबसाइट्सच्या माध्यमातून सांगितलं जातं. या अनऑफिशियल ॲप्समध्ये दडून बसलेला कोड एक्सहेल्पर ट्रोझन डाउनलोड करतो.




## फॅक्ट्री रिसेट करूनही रिमूव्ह होत नाही

अँड्रॉइड डिव्हाइसच्या ॲप सेक्शनमधून एक्सहेल्पर अनइन्स्टॉल केलं तरी प्रत्येकवेळा ते पुन्हा इन्स्टॉल होतं. डिव्हाइस फॅक्ट्री रिसेट केल्यानंतरही ते पुन्हा इन्स्टॉल होतं. गेल्या काही महिन्यांपासून अनेक यूजरनं एक्सहेल्पर अनइन्स्टॉल होत नसल्याच्या तक्रारी रेड्डिट, गुगल प्ले हेल्प आणि अन्य हेल्पलाइन व्यासपीठांवर केल्या आहेत.

# मोबाईलची काळजी...

**पावसाळ्यात मोबाईलची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. तुमचा फोन पाण्यापासून सुरक्षित ठेवण्यासाठी काही सोप्या टिप्स...**

- वॉटरप्रूफ कव्हर किंवा पाउच वापरा : पावसाळ्यात बाहेर जाताना तुमच्या फोनसाठी वॉटरप्रूफ कव्हर किंवा पाउच वापरा. यामुळे तुमच्या फोनमध्ये पाणी जाण्याची शक्यता कमी होईल.
- फोन ओल्या हाताने हाताळू नका : ओल्या हाताने फोन हाताळल्यास तो निसटून पडू शकतो किंवा पाणी फोनच्या पोर्टमध्ये जाऊ शकते.
- झिप-लॉक बॅग : तुमच्याकडे वॉटरप्रूफ कव्हर नसल्यास, तुमचा फोन साध्या झिप-लॉक बॅगमध्ये ठेवा.
- चार्जिंग करताना काळजी : तुमचा फोन पूर्णपणे कोरडा झाल्यावरच चार्ज करा.
- तांदूळ किंवा सिलिका जेल : तुमचा फोन पाण्यात पडल्यास, तो तांदूळ किंवा सिलिका जेलमध्ये ठेवा.
- पोर्ट स्वच्छ ठेवा : तुमच्या फोनचे पोर्ट (charging port, headphone jack) स्वच्छ आणि कोरडे ठेवा.
- ब्लूटूथ इयरफोन वापरा : कॉलसाठी ब्लूटूथ इयरफोन वापरा, ज्यामुळे फोन ओल्या हाताने हाताळण्याची गरज भासणार नाही. या सोप्या टिप्स वापरून तुम्ही तुमच्या फोनला पावसाळ्यात सुरक्षित ठेवू शकता.

# आला पावसाळा संगणकाची काळजी

काही महत्वाच्या टिप्स



**पावसाळ्यात संगणकाची काळजी घेण्यासाठी काही महत्वाच्या गोष्टी आहेत. पहिला म्हणजे, ओलसरपणा टाळणे. संगणकाला जास्त उष्णता किंवा थंडीपासून वाचवा. दुसरे म्हणजे, वीज-प्रवाह व्यवस्थित आहे की नाही ते तपासा आणि तिसरे म्हणजे, नियमितपणे संगणकाची साफसफाई करा. चौथे, महत्वाचे डेटाचा बॅकअप घ्या. पाचवे, जर काही शंका असल्यास, तज्ज्ञांची मदत घ्या.**

- ओलसरपणा टाळा : पावसाळ्यात हवेत भरपूर ओलसरपणा असतो. त्यामुळे संगणकामध्ये ओलसरपणा जाण्याची शक्यता असते. ओलसरपणा टाळण्यासाठी, संगणकाला हवाबंद डब्यात ठेवा. तसेच, संगणकाला ओल्या हाताने किंवा कपड्याने स्पर्श करणे टाळा.
- उष्णता आणि थंडीपासून वाचवा : उष्णता आणि थंडीमुळे संगणकाचे घटक खराब होऊ शकतात. त्यामुळे, संगणकाला थेट सूर्यप्रकाश किंवा जास्त उष्णता असलेल्या ठिकाणी ठेवणे टाळा. तसेच, संगणकाला जास्त थंडीतही ठेवणे टाळा.
- वीज-प्रवाह तपासा : पावसाळ्यात वीज पडण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे, संगणकाला वीज-प्रवाहापासून वाचवण्यासाठी, त्याला यूपीएस (UPS) किंवा सर्ज प्रोटेक्टरला जोडून ठेवा.



- नियमित साफसफाई : संगणकाच्या आत आणि बाहेर धूळ साचल्यास, ते व्यवस्थित काम करत नाही. त्यामुळे, नियमितपणे संगणकाची साफसफाई करणे महत्वाचे आहे.
- डेटाचा बॅकअप : पावसाळ्यात संगणक खराब होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे, महत्वाच्या डेटाचा बॅकअप घेणे आवश्यक आहे.
- तज्ज्ञांची मदत : जर तुम्हाला संगणकाशी संबंधित काही समस्या येत असतील, तर तज्ज्ञांची मदत घ्या.

### वापर कमी करा...

पावसाळ्यात, संगणकाला जास्त वेळ चालू ठेवणे टाळा. संगणकाला जास्त वेळ एकाच ठिकाणी ठेवण्याऐवजी, त्याला थोडा वेळ हलवा. संगणकाला जास्त भार देऊ नका. संगणकाला व्यवस्थित थंड होऊ द्या. पावसाळ्यात, संगणकाचा वापर कमी करा.

# स्कॅन करून टाक!

**स्कॅनर आणि प्रिंटर हल्ली प्रत्येक घरी बघायला मिळतात. जर हाच स्कॅनर तुम्हाला मोबाइलमध्येही उपलब्ध होतो. सध्या सगळ्यांकडे दर्जेदार कॅमेरा असलेला मोबाइल आहे. त्याच कॅमेऱ्याच्या मदतीनं आणि विविध स्कॅनिंग ॲप्सच्या साहाय्यानं मोबाइलमध्ये स्कॅन करू शकता. एवढंच नाही तर एडीट, क्लाऊडवर अपलोड किंवा प्रिंटसुद्धा करू शकता. चला तर मग जाणून घेऊ या अशा ॲप्सबद्दल...**




- ॲडॉब स्कॅन : ॲडॉब स्कॅन हे वापरायला खूप सोपं आणि मस्त आहे. फक्त ॲपमधील कॅमेरा तुमच्या हव्या त्या पानावर आणा आणि स्कॅन करा की झालं! या ॲपमध्ये इनबिल्ट ओसीआर सपोर्ट पण आहे. तुम्ही तुमचं स्कॅन एडीटसुद्धा अगदी आरामात करू शकता. जवळपास आवश्यक ते सगळे फीचर्स या ॲपमध्ये आहेत.
- कॅम स्कॅनर : हे ॲप खूप लोकप्रिय ॲप्सपैकी एक आहे. अँड्रॉइडवर जवळपास करोडो लोकांनी हे ॲप वापरलं आहे. इतर ॲप्सप्रमाणे हे पण स्कॅन तर करतंच तसंच तुम्हाला जेपीइजी किंवा पीडीएफमध्ये सेव्ह करायचा पर्याय पण देतं. तुम्ही स्कॅन केलेल्या फाइलला पासवर्डही ठेवू शकता. यात ॲड्स आहेत आणि पैसे देऊन तुम्ही अजून चांगले फीचर्स विकत घेऊ शकता.
- टायनी स्कॅनर : हे ॲपसुद्धा खूप लोकप्रिय आहे. यात कुठल्याही प्रकारचं लॉग इन करावं लागत नाही. तुम्ही कुठलीही फाइल स्कॅन करू शकता आणि ती पीडीएफमध्ये सेव्ह करू शकता. यातल्या खूप साऱ्या फीचर्समुळे आणि कमी साइजमुळे हे ॲप इतर ॲपपेक्षा खूप हट के ठरतं. यात तुमचं स्कॅन कलर, ब्लॅक अँड व्हाइट आणि ग्रेस्केल यामध्ये सेव्ह करायचा सुद्धा पर्याय आहे. या ॲपमध्येसुद्धा ॲडस आहेत. तसंच चांगले फीचर्स विकत घेण्याचा पर्यायसुद्धा उपलब्ध आहे.
- ऑफिस लेन्स : मायक्रोसॉफ्टनं हे ॲप बनवलेलं असल्यामुळे इतर ॲप्सपेक्षा वापरायला आणि लूकला मस्तच आहे. स्कॅन केलेल्या फाइल्स तुम्ही इमेज, पीडीएफ आणि पावरपॉइंटमध्येसुद्धा सेव्ह करू शकता. इंग्रजी बरोबर हे ॲप स्पॅनिश, जर्मन अशा भाषांमध्ये पण चालतं. शाळेसाठी आणि विविध कामासाठी हे ॲप खूपच उपयुक्त आहे. ॲपमध्ये ॲडस नाहीत.
- टर्बो स्कॅन : हे ॲप लोकप्रिय तर आहेच तसंच फ्री व्हर्जनसोबत याचं पेड व्हर्जनसुद्धा उपलब्ध आहे. या ॲपमधल्या शुअरस्कॅन मोडच्या मदतीनं अगदी सुस्पष्ट स्कॅन करू शकतो. खूप साऱ्या फाइल्स स्कॅन करणं असू दे किंवा क्लाऊडवर अपलोड करणं असू दे, ही सगळी कामं हे ॲप अगदी मस्त करतं. या ॲपमध्येही ॲडस नाहीत, पण तुम्ही तुमच्या गरजेनुसार फीचर्स खरेदी करू शकता.
- स्मार्ट डॉक स्कॅनर : स्मार्ट डॉक स्कॅनर ॲपमध्ये स्कॅनिंगसाठी लागणारे बहुतेक सर्व महत्त्वाचे फिचर्स आहेत. हे ॲप ओसीआरच्या मदतीनं जवळपास ४० पेक्षा जास्त भाषांना सपोर्ट तर करतंच तसंच स्पेलिंग चूक की बरोबर हे पण सांगतं. तुम्ही तुमचं स्कॅन केलेलं जेपीइजी, बीएमपी अशा खूप साऱ्या फाइल फॉरमॅटमध्ये सेव्ह करू शकता आणि क्लाऊडवर अगदी आरामात अपलोड करू शकता. हे ॲप खूप कमी मोबाइलमध्ये जागा घेतं, तसंच वापरायला पण सोपं आहे. या ॲपमध्येसुद्धा ॲडस नाहीत.

# गुगल अकाउंटमध्ये या सेवा घेता की नाही?

**ऑनलाइनच्या काळात इंटरनेटफ्रेंडली असणे चुकीचे नाही. मात्र, आपली माहिती सर्वांकरता, त्रयस्थांसाठी आहे असे बिलकूलच नाही. आपल्या माहितीचा, डेटाचा दुरुपयोग होत असल्याच्या अनेक बातम्या समोर येतात. त्यावर खबरदारीचा उपाय म्हणून काही गोष्टी करणे आवश्यक आहे. गुगलमधील काही सेटिंग्जमध्ये बदल केल्यास आपली माहिती खासगी राहू शकते. जेणेकरून डेटा ट्रॅकिंगला काही प्रमाणात रोखता येईल.**

- ई-मेल ट्रॅकिंग ब्लॉक करा : तुमच्या जीमेल अकाउंटवर जा. उजवीकडे वरील बाजूस सेटिंग्स पर्याय निवडा. त्यानंतर तिथे इमेज यामध्ये जाऊन आस्क बिफोर डिस्प्लेईंग एक्स्टर्नल इमेजेस हा पर्याय निवडा आणि बदल सेव्ह करा. यातून आपला मेल ट्रॅक होणे बंद होईल.
- लोकेशन ट्रॅकिंग थांबवा : गुगलमध्ये लोकेशन हिस्ट्रीमध्ये आपण कधी, कुठे, केव्हापर्यंत होतो आदीबाबतची सगळी इत्यंभूत माहिती उपलब्ध होते. त्याशिवाय आपण निवडलेले ठिकाण, हॉटेल, जेवण, वस्तू यांच्या आधारे पुढील वेळी आपल्याला गुगल काही ठिकाणे, हॉटेल्स सुचवतो. एकप्रकारे गुगलचे आपल्या आवडीनिवडीवरही लक्ष असून अप्रत्यक्ष हस्तक्षेप असतो. हे बंद करण्यासाठी गुगल होम पेजवर वर्तुळाकारमध्ये असलेल्या गुगल अकाउंटवर क्लिक करा. त्यानंतर गुगल अकाऊंट डाटा पर्सोनलिझेशन लोकेशन हिस्ट्री वर जा. त्यानंतर पाऊज पर्यायावर क्लिक करा व सेव्ह करा.
- व्हाइस रेकॉर्डिंग थांबवा : गुगलला सर्व माहिती असते. गुगल अस्टिटंट वापरताना गुगल आपल्याकडून आपला आवाज आणि इतर ऑडिओ रेकोर्ड करण्यात येतात. गुगलने तुमचा आवाज रेकोर्ड करून सेव्ह करणे थांबवावे असे तुम्हाला वाटत असल्यास तुम्ही थांबवू शकता. डाटा पर्सोनालिझेशन या पर्यायावर पुन्हा जा. तिथे व्हॉइस ऑडिओ ॲक्टिव्हिटीवर क्लिक करा आणि पुन्हा पाऊज करा.
- पर्चेस हिस्ट्री डिलीट करा : गुगलच्या गुगल प्ले स्टोर, गुगल एक्स्प्रेस, गुगल अस्टिटंट आदींचा वापर आपण करत असतो. यात आपण काय केले, याची माहिती नमूद असते. ही माहिती आपण डिलीट करू शकतो. त्यासाठी जीमेल अकाउंटमध्ये जाऊन माय अकाऊंट पर्चेस मध्ये जा. तिथे रिमूव्ह पर्चेस व्ह्यू ई-मेल मोअर डिलीट धीस मॅसेज असा पर्याय निवडावा.
- गुगलला करा बाय बाय : गुगल हे सर्च इंजिन छोट्या मोठ्या गोष्टींसाठी वापरले जाते. त्यात आपली माहिती सेव्ह होत असते. ही माहिती गुगलने वापरू नये यासाठी गुगल वापरणं सोडून द्या. गुगलऐवजी डक डक गो हे सर्च इंजिन वापरा. यामध्ये तुमची कोणतीही माहिती ट्रॅक केली जात नाही. गुगल अकाउंटशिवाय इतर कामासाठी वापरण्यासाठी हा चांगला पर्याय आहे.
- टू फॅक्टर ऑथेंटिकेशन सुरू करा : तुमचे अकाउंट हॅक होऊ नये, यासाठी हा चांगला पर्याय आहे. टू फॅक्टर ऑथेंटिकेशन सुरू करण्यासाठी सेक्युरिटी टू स्टेप व्हेरीफिकेशन री एंटर यूअर पासवर्ड असा पर्याय निवडून पुढे दिलेल्या सूचनांनुसार क्लिक करा.



# नकळत चुका, वॉशिंग मशीनसाठी नुकसानकारक

**असे म्हटले जाते की प्रत्येक मशीन चालवण्याची एक पद्धत असते. जर ते मशीन योग्यरित्या चालवले नाही तर खराब होणे निश्चित आहे. तुमचे वॉशिंग मशीनदेखील यापेक्षा वेगळे नाही. अनेक वेळा लोक जाणूनबुजून किंवा नकळत काही चुका करतात ज्या त्यांच्या वॉशिंग मशीनसाठी नुकसानकारक ठरतात. तुम्हाला सांगतो की या चुका किरकोळ वाटू शकतात पण मशीनच्या आयुष्यावर खोलवर परिणाम करतात. येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे वॉशिंग मशीन चालवण्याशी संबंधित या चुका वर्षानुवर्षे मशीन वापरणाऱ्या लोकांकडूनही होतात. अशा परिस्थितीत, त्याबद्दल जाणून घेणे आणि त्या पुन्हा न करणे तुमच्या मशीनसाठी आणि खिशासाठी फायदेशीर ठरू शकते. आम्ही वॉशिंग मशीन आणि एसी तज्ज्ञ शैलेंद्र शर्मा यांच्याशी बोललो आहोत आणि तुमच्यासाठी काही खूप महत्त्वाच्या टिप्स शोधल्या आहेत.**

- मशीन भरून कपडे धुवू नका... : जवळजवळ प्रत्येकजण वॉशिंग मशीनमध्ये करत असलेली एक सामान्य चूक म्हणजे कपडे भरलेले मशीन वापरणे. प्रत्येक वॉशिंग मशीनमध्ये कपडे धुण्याची एक मर्यादा असते. जर तुम्ही कोणत्याही वॉशिंग मशीनमध्ये त्यापेक्षा जास्त कपडे धुतले तर तुमचे कपडे खूप वाईट धुतले जातीलच, परंतु वॉशिंग मशीनच्या मोटरसारखे महत्त्वाचे आणि महागडे भाग देखील खराब होऊ शकतात. कोणत्याही वॉशिंग मशीनमध्ये कपडे स्वच्छ होण्यासाठी, कपडे मशीनमध्ये फिरू शकतील हे महत्वाचे आहे. जर वापरकर्त्याने वॉशिंग मशीनमध्ये कपडे गच्च भरले तर कपडे फिरणार नाहीत किंवा स्वच्छ होणार नाहीत आणि मोटरसारख्या भागांवर अतिरिक्त भार पडेल, ज्यामुळे ते जळण्याची शक्यता वाढते.
- क्लीनर न वापरणे : जसे वॉशिंग मशीनमध्ये कपडे स्वच्छ करण्यासाठी डिटर्जंट वापरला जातो, त्याचप्रमाणे वेळोवेळी वॉशिंग मशीन स्वच्छ करण्यासाठी डिस्केलर वापरला जातो. हे एक वॉशिंग मशीन क्लीनर आहे, जे पावडर आणि लिक्विड दोन्ही स्वरूपात उपलब्ध आहे. याला डिस्केलिंग पावडर किंवा डिस्केलिंग लिक्विड म्हणून ओळखले जाते आणि वेळोवेळी ते वापरणे तुमचे वॉशिंग मशीन नवीन दिसण्यासाठी, कपडे धुणे अधिक प्रभावी बनवण्यासाठी आणि वॉशिंग मशीनचे आयुष्य वाढवण्यासाठी खूप महत्वाचे आहे. ते वापरणे देखील खूप सोपे आहे. तुम्हाला हे डिस्केलिंग पावडर किंवा लिक्विड तुमच्या मशीनमध्ये निर्धारित प्रमाणात ठेवावे लागेल आणि मशीनला संपूर्ण सायकल चालू द्यावी लागेल. लक्षात ठेवा की या काळात मशीनमध्ये आणखी कपडे ठेवू नका. कारण मजबूत रसायने तुमचे कपडे खराब करू शकतात. डिस्केलरने मशीनचे पूर्ण वॉश सायकल चालवल्यानंतर, तुमचे मशीन नवीनसारखेच राहील.
- ट्रॉली किंवा स्टँड वापरणे नाही : जर तुम्ही तुमच्या वॉशिंग मशीनमध्ये अशी चूक करत असाल तर ती ताबडतोब दुरुस्त करा. खरं तर, कोणत्याही वॉशिंग मशीनसोबत स्टँड किंवा ट्रॉली वापरणे आवश्यक आहे. खरं तर, हे स्टँड केवळ वॉशिंग मशीन पोर्टेबल बनवत नाही तर वॉशिंग मशीनच्या शरीराचे गंजण्यापासून संरक्षण देखील करते. खरंतर, वॉशिंग मशीन वापरताना वारंवार ओले होणे ही एक सामान्य गोष्ट आहे. सेमी-ऑटोमॅटिक वॉशिंग मशीनच्या बाबतीत हे जास्त घडते. तथापि, हे तुम्हाला लहान वाटेल, परंतु वारंवार ओले झाल्यामुळे, वॉशिंग मशीनच्या बॉडीला गंज येऊ लागतो आणि वितळू लागते. ते मशीनच्या खालच्या भागातून सुरू होते. अशा परिस्थितीत, जर तुम्ही देखील वॉशिंग मशीन वापरत असाल तर त्याच्यासोबत ट्रॉली नक्कीच वापरा.
- मशीनचे कंट्रोल पॅनल ओले करणे : अनेकदा लोक त्यांचे मशीन अधिक स्वच्छ ठेवण्यासाठी ते पूर्णपणे ओले करून स्वच्छ करण्याचा प्रयत्न करतात. या दरम्यान, ते मशीनचे कंट्रोल पॅनल देखील ओले करतात आणि ही एक मोठी चूक असल्याचे सिद्ध होते. कंट्रोल पॅनल म्हणजे मशीनचा तो भाग ज्याद्वारे मशीन चालवली जाते. मशीनचा मदरबोर्ड, ज्याला पीसीबी देखील म्हणतात, या भागात असतो. हा भाग ओला केल्याने, मशीनचे कंट्रोल पॅनल खराब होण्याची शक्यता वाढते आणि ते तुम्हाला खूप महागात पडू शकते. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला मशीन चालवल्यानंतर बाहेरून स्वच्छ करावे लागले तर कोरड्या कापडाच्या मदतीने हे काम करा. : कपडे सुकवताना मशीनचे झाकण उघडणे
- तज्ज्ञ शैलेंद्र शर्मा यांच्या मते, लोक त्यांच्या वॉशिंग मशीनमध्ये कपडे सुकवताना अचानक मशीनचे झाकण उघडतात. लोक मशीनमधून कपडे काढताना घाईघाईने हे करतात आणि या छोट्याशा कृतीमुळे वॉशिंग मशीनचे अनेक भाग खराब होतात. कपडे सुकवताना वॉशिंग मशीनचे झाकण अचानक उघडल्याने मशीनच्या मोटरवर दबाव येतो कारण अशा परिस्थितीत कपडे सुकवण्यासाठी वेगाने फिरणाऱ्या मोटरला अचानक ब्रेक लागतो.

# प्रतापगडाच्या पायथ्याशी वीर जीवाजी महाले यांचे भव्य स्मारक उभारणार; प्रथम टप्प्यात १ कोटींचा निधी

## • पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांची विधानसभेत माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी वीर जीवाजी महाले यांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या प्रकल्पासाठी प्रथम टप्प्यात १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी गुरुवारी विधानसभेत दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्णयातून हा प्रकल्प साकार होणार असल्याचे देसाई यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महाबळेश्वर दौऱ्यादरम्यान विविध शिवप्रेमी संघटनांनी वीर जीवाजी महाले यांचे स्मारक उभारण्याची मागणी केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून पर्यटन विभागामार्फत प्रतापगडाच्या पायथ्याशी भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

देसाई म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या इतिहासात वीर जीवाजी महाले यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रतापगडाच्या ऐतिहासिक लढाईत त्यांनी समयसूचकता, धाडस आणि पराक्रमाचे दर्शन घडवत छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राण वाचवले. होता जीवा म्हणून वाचला शिवा ही उक्ती त्यांच्या शौर्याची साक्ष देणारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरवर्षी १० नोव्हेंबर रोजी प्रतापगडावर शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सोहळ्यासाठी लाखो शिवप्रेमी, इतिहास अभ्यासक, विद्यार्थी तसेच देश–विदेशातील पर्यटक प्रतापगडाला भेट देतात. त्यामुळे प्रतापगडाचे ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व सातत्याने वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले.

वीर जीवाजी महाले यांचे स्मारक उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून विविध सामाजिक संस्था, इतिहास संशोधक, शिवप्रेमी संघटना आणि लोकप्रतिनिधींकडून होत होती. शासनाने या मागणीची दखल घेत पर्यटन विभागाच्या जागेवर हे स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला असून, प्रथम टप्प्यात १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येणार आहे.

### पंतप्रधान मोदींनी घेतली ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अल्बानीज यांची भेट

**मेलबर्न (वृत्तसंस्था) –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या तीन देशांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात गुरुवारी मेलबर्न येथे ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान संरक्षण, सुरक्षा, व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, लोकसंपर्क तसेच उदयोन्मुख आणि महत्त्वाच्या तंत्रज्ञानासह अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे.

अल्बानीज यांच्यासोबतच्या बैठकीनंतर पंतप्रधान मोदी आणि ऑस्ट्रेलियन पंतप्रधानांनी भारत–ऑस्ट्रेलिया सीईओ फोरम आणि इकॉनॉमिक रोडमॅप बिझनेस रिसेप्शन कार्यक्रमात सहभाग घेतला.सीईओ फोरमला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, आज या सभागृहात भारत आणि ऑस्ट्रेलियाची व्यावसायिक ताकद आणि महत्त्वाकांक्षा एकत्रितपणे दिसून येत आहे.

# पुण्यात मावळमध्ये दरड कोसळून घर गाडले; ९ जणांची सुटका, युद्धपातळीवर बचावकार्य सुरू



**पुणे(प्रतिनिधी)–** पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात मुसळधार पावसामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. विसापूर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पाटण गावात पहाटे दरड कोसळून एका कुटुंबाचे घर मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास दरड कोसळल्यानंतर घरातील सदस्य अडकल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, महसूल प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, लष्कर, अग्निशमन दल आणि स्थानिक प्रशासनाने संयुक्तपणे बचाव मोहीम सुरू केली.

बचाव पथकांनी आतापर्यंत ९ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश मिळवले आहे. मात्र, आणखी ८ ते ९ जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून त्यांचा शोध सुरू आहे. जेसीबी आणि अत्याधुनिक बचाव उपकरणांच्या मदतीने मातीचा ढिगारा हटविण्याचे काम सुरू आहे.

# बिलोली व वैजापूर क्रीडा संकुलांची रखडलेली कामे लवकर पूर्ण करणार–सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**मुंबई(प्रतिनिधी) –** नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुका क्रीडा संकुलाच्या उर्वरित कामांसाठी वाढीव निधीची फेरनिविदा प्रक्रिया सुरू असून, काम लवकर पूर्ण करण्यात येईल. तसेच कामातील दिरंगाई आणि अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाची चौकशी करून संबंधितांवर मुख्य अभियंत्यांच्या माध्यमातून कारवाई केली जाईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विधानसभेत लक्षवेधीला उत्तर देताना दिली.

विधानसभा सदस्य जितेश अंतापूरकर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले बोलत होते. या लक्षवेधीत सदस्य रमेश बोरनारे यांनी सहभाग घेतला.

सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांनी सांगितले की, बिलोली तालुका क्रीडा संकुलाला ७ मे २०१८ रोजी १ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता, तर १८ जानेवारी २०१९ रोजी तांत्रिक मान्यता देण्यात आली होती. बहुउद्देशीय हॉल, कार्यालयीन इमारत, संरक्षक भिंत, विद्युतीकरण, पाणीपुरवठा आणि अंतर्गत रस्त्यांच्या कामासाठी आतापर्यंत सुमारे ९५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून त्यानुसार बहुतांश काम पूर्ण झाले आहे.

उर्वरित कामासाठी काढलेल्या निविदेवर हरकती आल्याने फेरनिविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तालुका क्रीडा समितीशी चर्चा करून पुढील कार्यवाही तातडीने पूर्ण केली जाईल, असे मंत्री भोसले यांनी सांगितले.

तसेच लोकप्रतिनिधींनी केलेल्या पत्रव्यवहाराला संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी प्रतिसाद न दिल्याचे निदर्शनास आले असून, संबंधित अधिकाऱ्यांच्या वर्तनाची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्यात येईल तसेच लोकप्रतिनिधींच्या पत्रांना वेळेत उत्तर देण्याच्या सूचना दिल्या जातील. वैजापूर येथील क्रीडा संकुलास निधी मंजूर होऊनही पाच–सहा वर्षांनंतरही काम पूर्ण न होण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तसेच क्रीडा विभागाच्या वतीने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची तपासणी करून क्रिडा संकुलाचे काम गतीने पूर्ण करण्यात येईल, असे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

### देशात पावसाची एकूण तूट २४ टक्क्यांवर, आतापर्यंत ३५० लाख हेक्टरवर खरीप पेरणी पूर्ण

**नवी दिल्ली(प्रतिनिधी)–**केंद्रीय कृषी, कृषक कल्याण आणि ग्राम विकास मंत्री शिवराज सिंह चौहानम्हणाले की, जूनमध्ये ३३% पावसाची तूट नोंदवली गेली, त्यानंतर जुलैमध्ये मान्सूनच्या परिस्थितीत सुधारणा दिसून आली, आणि पावसाची एकूण तूट कमी होऊन २४ टक्क्यांवर आली. त्यांनी पुढे सांगितले की, गेल्या काही दिवसांत देशाच्या अनेक भागांमध्ये चांगला पाऊस झाल्यामुळे पर्जन्यमानाची कमतरता असलेल्या जिल्ह्यांची संख्या २६२ वरून १७८ वर आली.

नवी दिल्लीत उच्च स्तरीय आढावा बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना चौहान म्हणाले की, केंद्र सरकार महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, बिहार, झारखंड, तेलंगणा, आंध्र प्रदेश, पंजाब, पश्चिम बंगाल आणि ओदिशा येथील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत आहे. जुलै महिन्यात पावसाचा जोर आणखी वाढेल, आणि त्यामुळे खरीपातील पेरणीला गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

---

तहसिलदार तथा दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात
प्रकरण – जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत.
अर्ज क्रं. ११६/२०२६

## जाहीर प्रगटन

विषय:– जन्म / मृत्यू नोंदणी अधिनियम सुधारित आणि जन्म व मृत्यू नोंदणी १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबतचे जाहीर प्रगटन.

संदर्भ– श्रीकांत कैलास कापसे रा. कार्ला त.मा. ता. नायगांव खै. जि. नांदेड यांचा अर्ज दि. २३/०६/२०२६

ज्याअर्थी अर्जदार श्रीकांत कैलास कापसे रा.कार्ला त.मा. ता. नायगांव खै. जि. नांदेड यांचा अर्ज दि. २८/०४/२०२६ अर्जदार श्रीकांत कैलास कापसे यांचा जन्म दि. २९/१०/२००७ रोजीची जन्म नोंद आदेश मिळणे बाबत विनंती केली आहे. तसेच अर्जदार यांनी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय कार्ला त.मा. ता. नायगांव (खै.) जि. नांदेड येथे जन्म / मृत्यू दाखल्याची मागणी अर्ज दिला असता संबंधित उपनिबंधक जन्म/मृत्यू नोंद ग्राम पंचायत कार्ला त.मा. ता. नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू नोंद अधिनियम १९६९ च्या कलम ११ अन्वये नमुना १० (अ) व १० (ब) अन्वये नोंद नसल्याचे लेखी अनुलब्धता प्रमाणपत्र दि. २३/०६/२०२६ रोजीचे अर्जासोबत सादर केलेले आहे.

त्याअर्थी, अर्जदार यांनी त्यांच्या वडीलामार्फत या न्यायालयात जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ (सुधारीत) आधि कलम १३ (३) नुसार जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये अर्जदार श्रीकांत कैलास कापसे यांचा जन्म दि. २९/१०/२००७ जन्मजन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय कार्ला त.मा. ता. नायगांव (खै.) जि. नांदेड यांना जन्म नोंद घेण्यासाठी आदेश देण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने अर्जदार यांची जन्माची खात्री करण्यासाठी या जाहिर प्रगटना व्दारे वर्तमानपत्रात प्रसीध्दी करण्यात येत आहे. जर कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी मा. तहसिलदार तथा तालूका दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावा. अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी या न्यायालयाच्या शिक्यासह देण्यात येते.

**तहसीलदार तथा तालुका**
**दंडाधिकारी नायगांव (खै.)**

---

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२६/२०२६
सुनिता भ्र. मारोती निलावाड व ईतर विरुध्द निरंक

अर्जदार – १. सुनिता भ्र. मारोती निलावाड वय ४९ वर्षे, २. श्रेया पि. मारोती निलावाड वय १८ वर्षे, ३. अश्वीनी भ्र. राजेश माहे वय २६ वर्षे, (पूर्व श्रेणीचे नांव – अश्वीनी पि. मारोती निलावाड)
अर्जदार क्र. १ व २ राहणार बाभळी (आ.) ता. बिलोली, जि. नांदेड
अर्जदार क्र. ३ राहणार – बिजूर ता. बिलोली, जि. नांदेड
विरुद्ध निरंक

विषय :– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत मारोती पि. माधवराव निलावाड यांचे अर्जदार क्र. १ या पत्नी आहेत व अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे व अर्जदार क्र. ३ हि मुलगी आहे. अर्जदार क्र. १ व २ राहणार बाभळी (आ.) ता. बिलोली जिल्हा नांदेड व अर्जदार क्र. ३ राहणार – बिजुर ता. बिलोली जिल्हा नांदेड येथील रहीवाशी आहेत. मयत मारोती पि. माधवराव निलावाड यांचा मृत्यु दिनांक १८/११/२०२५ रोजी शंकरराव चव्हाण मयताच्या पश्चात अर्जदार हेच वैदयकिय महाविदयालय व रुग्णालय विष्णुपुरी, नांदेड येथे झाला. मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत मारोती पि. माधवराव निलावाड यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक १०/०८/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप /उजर नाही असे समजून प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. ०१ जुलै, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली

---

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय देगलूर प्रशासकीय इमारत शिवाजी पुतळयाजवळ देगलूर पिन कोड ४३१७१७
ए–चरळश्रश्रऊीरहवशसश्रीसारळश्र.ले

## जाहीर प्रगटन

दुरध्वनी क्रमांक ०२४६३–२९५०४५

क्र. २०२६/जन्म–मृत्यू/कावी–६२ दिनांक १ /०६/२०२६

याव्दारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार कु. मोहम्मद मुजाहेद मोहम्मद अफजल रा. आनंद नगर देगलूर येथील असून त्यांनी या कार्यालयात त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

१. जन्म झालेल्याचे नाव कु. मोहम्मद मुजाहेद मोहम्मद अफजल

सदर व्यक्तीचा देगलूर या ठिकाणी दिनांक १७.१२.१९९५ या दिवशी जन्म झाला आहे. सदर व्यक्तीचा जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणकरीता दिनांक १८.०३.२०२६ रोजी तहसिल कार्यालय देगलूर येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांक, स्थळ व व्यक्तीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय देगलूर येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

**निवासी नायब तहसीलदार**
**तहसील, देगलूर**

---

## Change In Name

My Old Name is **KACHRULAL RAMKUMAR INANI** which now I am changing as New Name **KACHRULAL RAMKUMAR INNANI.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** chandragupt nagar nanded
Mob no 9423693027

## Change In Name

My Old Name is **SANDHYA KACHRULAL INANI** which now I am changing as New Name **SANDHYA KACHRULAL INNANI.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** chandragupt nagar nanded
Mob no 9423693027

## Change In Name

My old name is **Mohammed Ishrat Ahmed,**H.No.1-3-441, Shivaji Nagar, Nanded Tq.&Dist. Nanded-431602 [M.S.] which now I am changing as new name **Mohammed Ishrat Ahmed S/o. Mohammed Khaja,** H.No.1-3-441, Behind Masjide Abedin, Nai Abadi, Galli No.20, Nanded [Post office Shivaji nagar], Nanded PO.Nanded Dist. Nanded, Maharashtra-431601 Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

**Sign by-Mohammed Ishrat Ahmed S/o. Mohammed Khaja,** H.No.1-3-441, Behind Masjide Abedin, Nai Abadi, Galli No.20, Nanded [Post office Shivaji nagar], Nanded PO.Nanded Dist. Nanded, Maharashtra-431601

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड

## चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक ८२२/२०२६ कलम १९
सार्वजनिक न्यासाचे नाव–सहारा सेवाभावी संस्था, खडकपुरा नांदेड ता.जि. नांदेड

**अर्जदाराचे नाव–शायस्ताबेगम सय्यद मतीन**

सर्व संबधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमूद केलेल्या अहवाल अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमूद केलेला सार्वजनिक न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचा आहे काय?

अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्या कडे सभासद फी रुपये १०५७/ जमा आहेत.

ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामधे कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास कांही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाच्या निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड याचे शिक्यानिशी आज दिनांक ०२/०७/२०२८ रोजी दिली.

| | |
|---|---|
| (श्रीरामे बी. एन.) | (श्रीमती पी. ज. रॉय) |
| वरिष्ठ लिपिक | अधीक्षक |
| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड विभाग नांदेड | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड विभाग नांदेड |

---

महाराष्ट्र शासन

## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छ. संभाजीनगर

### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

**पत्ता–कार्यकारी अभियंता उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभागीय पथक क्र. ४, आखाडा बाळापूर जि. हिंगोली**
**ई मेल पत्ता–**ccuppd4@gmail.com
**दूरध्वनी क्र. (९४२१९०४३०१)**

### ई निविदा सूचना क्र. ०१ सन २०२६–२७ (प्रथम वेळ)

कार्यकारी अभियंता उर्ध्व पेनगंगा विभागीय पथक क्र. ४ आखाडा बाळापूर, जि. हिंगोली जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन निविदा मागवत आहेत. निविदा शासनाचे संकेतस्थळ http//mahatendersgov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभागीय पथक ४ आखाडा बाळापूर जि. हिंगोली यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किमत | अनामत रक्कम | ई–निविदा फीस | ई निविदा उपलब्ध कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेनगंगा नदीवरील धनोडा उच्च पातळी बंधाऱ्याच्या उजव्या तिरावरील उर्ध्व बाजूच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम, जि. नांदेड | ८८३.२० लक्ष | ४.४१६ लक्ष | रु. ५९०० | दि. ८/७/२०२६ ते दि. २२/७/२०२६ |
| २. | पेनगंगा नदीवरील पांगरा (साप्ती) उच्च पातळी बंधारा जि. नांदेडच्या पोहोंच रस्त्याचे | ६३७.६१ लक्ष | ३.१९ लक्ष | रु. ५९०० | दि. ८/७/२०२६ ते दि. २२/७/२०२६ |

खालील ठिकाणी ई–निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. संकेत स्थळ http//mahatendersgov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभागीय पथक क्र. ४ आखाडा बाळापूर जि. हिंगोली यांच्या कार्यालयातील सूचना फलक

कार्यकारी अभियंता
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभागीय पथक क्र. ४.
आखाडा बाळापूर जि. हिंगोली.

---

श्री छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण संस्था संचलित

## श्री. शंकरराव चव्हाण ग्रामीण अध्यापक विद्यालय

लोंढेसांगवी, ता. लोहा जि. नांदेड

**महाराष्ट्र शासन व एन.सी.डी.ई. भोपाळ मान्यताप्राप्त कोर्स**

### डी.एल.एड. प्रथम वर्ष व्यवस्थापन कोटा प्रवेश सूचना २०२६-२७

डी.एल.एड. प्रथम वर्ष २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी खाजगी विना अनुदानित अध्यापक विद्यालय प्रथम वर्ष डी.एल.एड. (मराठी माध्यम) प्रवेशासाठी एकूण क्षमतेच्या २० टक्के जागेसाठी खाजगी व्यवस्थापन कोट्यातील पात्र उमेदवरकडून अर्ज मंगविण्यात येत आहेत. तरी पत्र उमेदवारांनी खालील दर्शवलेल्या कालावधीत आवेदन पत्र सादर करावेत.

**ऑनलाईन अर्ज** : दि. ०८.०७.२०२६ ते १२.०७.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते मध्यरात्री १२.००
**विद्यार्थ्यांना विद्यालय लॉगिनमध्ये समाविष्ट करणे :** दि. ०८.०७.२०२६ ते १४.०७.२०२६
**व्यवस्थापन कोटा प्रवेश :**दि. ०८.०७.२०२६ ते १४.०७.२०२६
**ठिकाण** : श्री. शंकरराव चव्हाण ग्रामीण अध्यापक विद्यालय लोंढेसांगवी, ता. लोहा जि. नांदेड
**प्रवेश अर्ज शुल्क** : ओपन रु. २००/-
मंगसवर्गीयासाठी रु. १०० (जातीचे प्रमाण पत्र सोबत आणावे)
**शैक्षणिक पात्रता** : उमेदवार किमान १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान, एम.सी.व्ही.सी., य.च.म.मु.वि. प्रथमवर्ष उत्तीर्ण ओपन ५०% व मागासवर्गीयांसाठी ४५% गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
**प्रवेश क्षमता** : ५०% जागा (व्यवस्थापन कोटा १० जागा)
व्यवस्थापन कोट्यातील (२०टक्के) शाखा निहाय व संवर्ग निहाय आरक्षण खालील प्रमाणे आहे

| शाखा | विज्ञान (५०%) | कला (४०%) | वाणिज्य (१०%) | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी माध्यम | ०५ | ०४ | ०१ | १० |

**संवर्गनिहाय आरक्षण**

| संवर्ग | एस.सी., एस.टी. (३०%) | व्ही.जे.एन.टी. ए.बी.सी.डी. (११%) | एस.बी.सी., ओ.बी.सी. (१९%) | ओपन (५०%) |
|---|---|---|---|---|
| मराठी माध्यम | ०२ | ०१ | ०२ | ०५ |

**प्राचार्य,** श्री शंकरराव चव्हाण ग्रामीण डी.एड.कॉलेज लोंढेसांगवी, ता. लोहा जी. नांदेड
**मो. ९८२२००९६५८, ९४२३२३११९५**

---

## टी. सी. हरवली

माझी प्रणय सदानंद गायकवाड या नावाची दहावी पासची टी. सी. विष्णुपुरी ते वजिराबाद दरम्यान प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी.

**संपर्क पत्ता–**प्रणय सदानंद गायकवाड, रा. मील चाळ एनटीसी मिल एरिया, मार्कंडेय मंदिर, नांदेड मो. ९६२३२२२२१६

## टी. सी. हरवली

माझी वेदांत शंकर जवूळकर या नावाची इयत्ता बारावी पासची टी. सी. व बारावी पासची सनद, मार्कशीट नांदेड ते हिंगोली बस प्रवासा दरम्यान हरवली आहे. कुणाला सापडल्यास कृपया खालील क्रमांकावर संपर्क साधावा..
मो. क्र. ७२६४०११६०९


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा लातूरमधील तक्रारदारांशी 'संवाद'



**नांदेड (प्रतिनिधी)–** नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस – नागरिक यांच्यातील संवाद वाढवून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे.

परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. या दरम्यान, त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उपमहानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे.

गुरुवार, दि. ९ जुलै रोजी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक, लातूर कार्यालयात जिल्हा पोलिसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतला. यानंतर दुपारी ३ ते ५.३० या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. या दरम्यान, एकूण ४८ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उपमहानिरीक्षक यांना सोपविले. यात मालमत्ताविषयक वाद, हरवलेले इसम, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांचा तपास, अवैध व्यवसाय इत्यादी तक्रारींचा समावेश आहे.

सदर दिवशी, प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व शहरातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे हजर होते.

## नंदीग्राम एक्स्प्रेसच्या एसी कोचची हनीमून सजावट व्हायरल; रेल्वेचा सीटीआय निलंबित, २ जणांना दंड

### व्हीडीओ व्हायरल झाल्यानंतर रेल्वेची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** बल्लारशाह–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई धावणाऱ्या गाडी क्र. ११००२ नंदिग्राम एक्स्प्रेसच्या प्रथम वातानुकूलित H/1 डब्यातील G कुपेची हनीमूनसाठी सजावट करून त्याचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. याप्रकरणी एका मुख्य तिकीट तपासणीकाला निलंबित करण्यात आले असून, २ जणांकडून ३ हजार ३८० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर ते दादर असा प्रवास करणाऱ्या नवविवाहित जोडप्यासाठी H/1 डब्यातील G कुपे सजविण्यात आली होती. हा व्हीडीओ 'इन्स्टाग्राम'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता.

चौकशीत निष्पन्न झाले की, जालना येथील अजहर शेख (वय ३२ वर्षे, रा. जुना जालना) व जुबेर फारुकी रा. जालना यांनी विनापरवानगी सजावटीचे साहित्य घेऊन जालना येथून गाडीत प्रवेश केला. जालना ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान धावत्या गाडीत सजावट करून चिखलठाणा येथे व्हीडीओ काढून तो अपलोड करण्यात आला. सदर डब्याचे डेकोरेशन जालना येथे रहाट डेकोरेटेड यांनी केले होते.

हा प्रकार लक्षात येताच मुख्य तिकीट तपासणीक गिरीश कुमार नांदेड यांनी दिलेल्या तक्रारीवरून IPF/जालना यांनी चौकशी केली. अजहर शेख याच्याकडून विनातिकीट/अनधिकृत प्रवास व अनधिकृत



सजावटीबद्दल सुधारित जनविश्वास अधिनियम २०२६ चे कलम १३७ अन्वये २ हजार ३८० आणि कलम १४७ अन्वये ५०० रुपये असा एकूण २ हजार ८८० रुपये दंड वसूल केला.

जुबेर फारुकी याच्यावर रेल्वे परिसरात विनापरवानगी प्रवेश केल्याबद्दल कलम १४७ अन्वये ५०० रुपये दंड वसूल केला.

CTI गिरीश कुमार यांना कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याबद्दल दि. ८ जुलै २०२६ पासून निलंबित करण्यात आले आहे. एवढेच नाही तर त्यांची विभागीय चौकशी लावण्यात आली आहे. सदर G कुपे शुबम बांकर वय ३१ वर्षे व त्यांची नवविवाहित पत्नी सौ. सोनाली वय २५ वर्षे यांच्या नावावर PNR 6850548284 ने जालना ते दादरसाठी आरक्षित होती. त्यांचे बोर्डिंग स्थानक छत्रपती संभाजीनगर होते. शुभम बांकर यांनीच जुबेर फारुकी यांच्यामार्फत सजावटीची व्यवस्था केली होती.

दोन्ही आरोपींनी एकूण ३ हजार ३८० रुपये दंड भरला असून, भविष्यात असे कृत्य न करण्याची लेखी समज देण्यात आली आहे.

## शेत नावावर करून दे म्हणून मुलाने केला बापाचा खून; गुन्हा दाखल

**अर्धापूर(प्रतिनिधी)–** शेत नावावर करून दे म्हणत मुलाने केला बापाचा खून. ही घटना गुरुवार, दि. ९ जुलै रोजी घडली. या खून प्रकरणी आरोपी मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.

शहरातील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयासमोरील टिन शेडमध्ये रक्ताच्या थारोळ्यात एका इसमाचा मृतदेह पडलेला आहे, अशी माहिती पोलीस मिळाल्यानंतर उपाधीक्षक माणिक बेद्रे, पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर, सपोनि भास्कर कांबळे, सपोनि विष्णु कराळे, पोउनि सुरेश भोसले, दत्ता वानी यांनी घटनास्थळी भेट देऊन चौकशी केली. मयत इसमाची ओळख सखाराम नामदेव पातळे (वय ५२ वर्ष) रा.बारसगाव असल्याचे कळाले.

आरोपीने बापाच्या नावाने असलेले शेत नावावर करून न दिल्याने वडिलाच्या डोक्यात लाकडाने मारून डोके फोडून जिवे ठार मारून खून केल्याप्रकरणी आरोपी गुणाजी सखाराम पातळे रा. बारसगाव ता.अर्धापूर यांच्याविरुद्ध कलम १०३ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सासवड येथे दिंडीतील वारकऱ्यांसाठी दोन दिवसांचे मोफत उपचार शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सासवड येथे दिंडी मुक्कामी नांदेडचे सुजोक व निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. संभाजी पवार आणि सहकार्याद्वारे वारकऱ्यांसाठी गुडघे दुखी, कंबर दुखी यावर सुजोक आणि मसाजद्वारे दि. ११ आणि १२ जुलै २०२६ रोजी मोफत उपचार केले जाणार आहेत. सर्व भाविकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकातर्फे करण्यात आले आहे.

संत ज्ञानेश्वर माऊलीची दिंडी हडपसर पुणे ते सासवड ३२ कि. मी. प्रवास करून दिवेघाटातून सासवडला दोन दिवस मुक्कामी येते. या दिंडीत सहभागी भाविक, वयस्कर महिला, पुरुष असतात. एवढ्या खडतर प्रवासानंतर त्यांना गुडघेदुखी, कंबर दुखीचा त्रास होऊ शकतो म्हणून त्यांचा त्रास कमी करावा म्हणून नांदेडचे निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. संभाजी पवार, डॉ. अवधुत पवार आणि सहकाऱ्याच्या मदतीने दरवर्षी ही सेवा केली जाते.

या वर्षी या सेवेसाठी डॉ. संभाजी पवार, डॉ. अवधुत पवार यांच्यासोबत, नरेन्द्रसिंघ ग्रंथी, बाळासाहेब पवार, प्रकाश सावंत, अरविंद जाधव, अल्केश भोसीकर, उध्दव काकडे, विलास बागल, सतीश बागल, एकनाथ बागल, कान्हा देशमुख यांचे सहकार्य लाभणार आहे.

## गोदावरी पात्रातून अवैध रेती वाहतूक करणारा हायवा जप्त; ५७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

### मार्कंड घाटावर छापा, २ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध रेती उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई केली. या कारवाईत ५७ लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून २ अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई दि. ९ जुलै रोजी नांदेड ग्रामीण ठाण्याचे अधिकारी व अंमलदारांना हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, मार्कड येथील गोदावरी नदीपात्रात



काही मजुरांच्या साहाय्याने अवैधरित्या रेती उपसा करून वाहतूक केली जात आहे.

या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने पंचासह मार्कड शिवारातील गोदावरी नदीपात्राजवळ छापा टाकला. पोलिसांना पाहताच हायवामधील रेती जागेवर सोडून २ अज्ञात पळून गेले.

या कारवाईत घटनास्थळावरून बिना नंबरचा हायवा (किंमत ४५ लाख रुपये), रेती उपसाचे २ इंजिन (किंमत ६ लाख रुपये), १० तराफे व २० ब्रास रेती (किंमत ६ लाख रुपये), नदीकाठावरील १० ब्रास रेती (किंमत २५ हजार रुपये) असा ५७ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यावेळी २ अज्ञात आरोपींविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८४७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) सह महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ४८(७), ४८(८) आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९, १५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## इंदुबाई वाळिंबे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील विनायकनगर परिसरातील रहिवासी व मनपा शाळेतील आदर्श शिक्षिका इंदुबाई कमलाकरराव वाळिंबे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने मंगळवारी (दि. ७) निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी (दि.८) गोवर्धन घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, सुना, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मनपाचे कर्मचारी आनंद वाळिंबे व गिरीश वाळिंबे यांच्या त्या आई तर पत्रकार गौरव वाळिंबे यांच्या त्या आजी होत.

## दत्तराम पाटील हंबर्डे यांचे निधन; आज अंत्यविधी



**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील वाका येथील रहिवाशी ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच, सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचे समर्थक दत्तराम भीमराव पाटील हंबर्डे (वय: ७३ वर्षे) यांचे दि. ९ जुलै रोजी दुपारी ४ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर येथील स्मशानभूमी दि. १० जुलै रोजी दुपारी १ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सुना, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## नांदेड-लातूर महामार्गावरील विष्णुपुरी पुलाच्या घटनेनंतर शिवसेनेचा इशारा; २४ तासांत चौकशी न झाल्यास आंदोलन –प्रकाश मारावार

**नांदेड (प्रतिनिधी)–** तुळजापूर ते बुटीबोरी जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील विष्णुपुरी येथील श्री गुरू गोविंदसिंघ अभियांत्रिकी महाविद्यालया-समोरील पुलाचा भाग गुरुवार दि. ९ जुलै रोजी कोसळल्याची घटना अत्यंत गंभीर आहे. यामुळे नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. या घटनेची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मुख्य महानगरप्रमुख प्रकाश मारावार यांनी केली आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी, नांदेड



व पोलीस अधीक्षक, नांदेड यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. तसेच या निवेदनाची प्रत विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनाही पाठविण्यात आली आहे.

निवेदनात पुलाच्या बांधकामात निकृष्ट दर्जा, निष्काळजीपणा किंवा अन्य अनियमितता झाली आहे का, याची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करण्यात यावी. चौकशीत दोष सिद्ध झाल्यास संबंधित कंत्राटदार, अभियंते व जबाबदार अधिकाऱ्यांवर तत्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत.नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर पुलाची व परिसरातील इतर संरचनांची तातडीने तपासणी करून आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात येणार आहे.

**पान १ वरून...**

**धक्कादायक : विष्णुपुरी नवीन...**

आणि बाकले यांनी तातडीने उड्डाणपुलावरील वाहतूक बंद केली. अपघातग्रस्त ठिकाणावरील सिमेंट काँक्रीटच्या विटा व इतर साहित्य दोन जेसीबीच्या मदतीने हटवून डंपरद्वारे ते स्थलांतरित करण्यात आले. पुलावरून जाणारी वाहतूक बंद करून ग्रामीण पोलीस, वाहतूक शाखा आणि जिल्हा पोलीस मुख्यालयातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या मदतीने पर्यायी एकतर्फी वाहतूक सुरू करण्यात आली. गेल्या अनेक दिवसांपासून लातूरकडे जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांसाठी ही वाहतूक सुरू होती. घटनेनंतर घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. गर्दी व सुरक्षेच्या कारणास्तव रस्त्यालगतची दुकानेही बंद करण्यात आली. दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत उड्डाणपुलावरील वाहतूक बंद राहणार असल्याचे व्यवस्थापक आनंद पुयड यांनी सांगितले. पुढील सूचना येईपर्यंत वाहनचालकांनी पुलाचा वापर करू नये, असे आवाहन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केले आहे.

**पान १ वरून...**

**विष्णुपुरी पूल ...**

करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली.

शासनाने तातडीने आपत्कालीन यंत्रणा कार्यान्वित करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, नुकसानग्रस्त भागांचे त्वरित पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी तसेच भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, असेही आमदार बोंढारकर यांनी अधिवेशनात नमूद केले.

भूकंप आणि पूल दुर्घटनेमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर शासनाने तातडीने निर्णय घेऊन नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी राज्य सरकारकडे केली.

## विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही

### १८ बीएलओ व ३ पर्यवेक्षकांविरुद्ध होणार कार्यवाही –डॉ. सचिन खल्लाळ

**नांदेड (प्रतिनिधी)–** ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघांतर्गत एकूण ३१२ मतदारयादी भागांमध्ये विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. या कामासाठी वारंवार सूचना देऊनही १८ बीएलओ व ३ पर्यवेक्षक यांची प्रगती अत्यंत कमी असल्याने त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी दिली.



या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या बीएलओ व त्यांच्या सहाय्यकांना उपस्थित राहण्यापासून अडवणूक करणाऱ्या संबंधित आस्थापना प्रमुखांनाही कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे पालन न केल्यास तसेच लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील तरतुदीनुसार संबंधित कार्यालय प्रमुखांविरुद्धही शिस्तभंग व कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय २५ बीएलओ व ६ पर्यवेक्षक यांची कामगिरी असमाधानकारक असल्याने त्यांनाही कारणे दाखवा नोटिसा देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. दि. १० व ११ जुलै या दोन दिवसांत त्यांच्या कामात अपेक्षित प्रगती न झाल्यास भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील तरतुदीनुसार संबंधितांविरुद्ध पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार आहे.

तसेच ज्या सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची कामगिरी समाधानकारक नाही, त्यांच्या कामात दि. ११ जुलैपर्यंत सुधारणा न झाल्यास त्यांच्याविरुद्धही कार्यवाहीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याचे डॉ. खल्लाळ यांनी सांगितले.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com